CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ५ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ५२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## इराणच्या क्षेपणास्त्रांचा थरार

वॉशिंग्टन : अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाने आता तीव्र स्वरूप घेतले असून, खाडी देशांमध्ये युद्धासारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अमेरिकेने इराणच्या एका महत्त्वाच्या बेटावर हल्ला केल्यानंतर, इराणने प्रत्युत्तर म्हणून कुवेत आणि बहरीन-वर क्षेपणास्त्र आणि भीषण ड्रोन हल्ले केले आहेत. बुधवारी पहाटे कुवेत विमानतळावर झालेल्या या हल्ल्यात एका भारतीयाचा मृत्यू झाला आहे आणि इतर अनेक जखमी झाले आहेत. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याचा निषेध केला आहे

## युद्धनौका आमने सामने

कोलंबो ::हिंदी महासागरात मोठी खलबतं घडत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. श्रीलंका आता जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे. भारताच्या शेजारील श्रीलंकेत एक दुर्मिळ आणि महत्त्वाची घटना घडली आहे. भारत आणि पाकिस्तान या दोन प्रतिस्पर्धी देशांच्या नौदलाची जहाजे एकाच दिवशी श्रीलंकेच्या कोलंबो बंदरात आली आहेत. श्रीलंकन नौदलाने या जहाजांच्या आगमनाची धक्कादायक माहती दिली असून, यामुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षा तज्ज्ञांसह सर्वांनाच कोलंबो बंदरात नेमके काय चालले आहे असा मोठा प्रश्न पडला आहे.

## दोन तरूणांचा मृत्यू

पुणे : महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेची माहिती घेऊन परत येत असताना दोन तरुणांवर काळाने झडप घातली. अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली. त्यात दुचाकीवरील दोन्ही तरूणांचा मृत्यू झाला. पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या हद्दीवरील सारोळा परिसरात हा अपघात झाला. अथर्व विजय पाटील (वय १७, रा. शिरवळ, ता. खंडाळा) आणि तुषार दादासाहेब शिंदे (वय १७, रा. नायगाव, ता. खंडाळा), अशी अपघातातील मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत.

## सुरक्षा रक्षकाकडून गोळीबार

नंदुरबार :नंदुरबार शहरातील स्टेट बँकेच्या मुख्य शाखेजवळ बुधवारी सायंकाळी एटीएममध्ये रोख रक्कम भरण्यासाठी आलेल्या कॅश व्हॅनच्या सुरक्षारक्षकाकडून चुकून गोळी सुटल्याची घटना घडली. गोळी फरशीवर आदळल्याने उडालेल्या तुकड्यांमुळे एका बँक कर्मचाऱ्याला किरकोळ दुखापत झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# नरेंद्र मोदी - डेल्सी रोड्रिग्ज यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक





वृत्तसंस्था

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी नवी दिल्ली येथे व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष डेल्सी रोड्रिज यांची भेट घेतली. हैदराबाद हाऊसमध्ये झालेल्या या बैठकीत भारत-व्हेनेझुएला संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा झाल्याची शक्यता आहे. विशेषतः ऊर्जा सुरक्षा, व्यापार व गुंतवणूक, औषधनिर्मिती (फार्मास्युटिकल्स), आरोग्य सेवा, वाहतूक आणि नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांतील सहकार्यावर भर देण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर डेल्सी रोड्रिज यांनी नवी दिल्लीतील महात्मा गांधी यांच्या समाधीस्थळ राजघाट येथे जाऊन पुष्पांजली अर्पण केली आणि त्यांना श्रद्धांजली वाहिली.यापूर्वी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी डेल्सी रोड्रिज यांची भेट घेत भारत आणि या दक्षिण अमेरिकन राष्ट्रामधील वाढत्या भागीदारीबाबत भारताची वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली. 'एक्स'वरील पोस्टमध्ये जयशंकर यांनी म्हटले, आज नवी दिल्लीमध्ये व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष डेल्सी रोड्रिज यांची भेट घेऊन आनंद झाला. त्यांनी भारत-व्हेनेझुएला संबंधांप्रती त्यांच्या दीर्घकालीन बांधिलकीचे कौतुक केले. जयशंकर म्हणाले, भारत-व्हेनेझुएला संबंधांबाबत त्यांची दीर्घकालीन वचनबद्धता मी अत्यंत महत्त्वाची मानतो. तसेच त्यांनी सांगितले की, डेल्सी रोड्रिज यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतची भेट दोन्ही देशांतील सहकार्य आणखी बळकट करेल.

# विधानपरिषदेच्या १७ पैकी ६ जागा बिनविरोध



तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ रिक्त जागांसाठी जाहीर झालेल्या विधान परिषद निवडणुकीच्या रणसंग्रामात गुरुवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी अत्यंत नाट्यमय घडामोडी घडल्या. संख्याबळाचे गणित अनुकूल नसल्याने महाविकास आघाडीच्या (मविआ) अधिकृत उमेदवारांसह अनेक बंडखोरांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. यामुळे मतदान होण्यापूर्वीच १७ पैकी तब्बल ६ जागा बिनविरोध करण्यात महायुतीला यश आले आहे. यामध्ये ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, पुणे आणि अहिल्यानगर या जागांचा समावेश आहे. विशेषतः कोकणात भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी शेवटच्या दोन तासांत चक्रे फिरवून मविआचे अधिकृत उमेदवार बाळ माने यांची माघार घडवून आणल्याने 'उबाठा' गटाला जोरदार धक्का बसला आहे.या निवडणुकीसाठी येत्या १८ जून रोजी मतदान आणि २२ जून रोजी मतमोजणी होणार असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष या रणधुमाळीकडे लागले आहे. गुरुवारी दुपारी ३ वाजेपर्यंत असलेल्या अर्ज माघारीच्या मुदतीत महायुतीने आपल्या गोटातील बंडखोरी थोपवण्यात मोठे यश मिळवले, तर दुसऱ्या बाजूला मविआच्या गोटात मात्र पूर्णपणे निराशा पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले. कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात सर्वात मोठा राजकीय भूकंप झाला. येथे मविआचे उमेदवार म्हणून उबाठा गटाचे सुरेंद्र ऊर्फ बाळ माने यांनी अर्ज भरल्यामुळे रंजक लढत होईल असे वाटत होते. मात्र, अर्ज मागे घेण्याची मुदत संपण्यास अवघे दोन तास शिल्लक असताना मंत्री नितेश राणे यांनी बाळ माने यांच्याशी संपर्क साधला. नितेश राणे स्वतः बाळ माने यांना सोबत घेऊन रत्नागिरीच्या जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचलेआणि तिथे माने यांनी आपला अर्ज मागे घेतला. मविआतील घटक पक्षांनी आपल्याला शेवटपर्यंत साथ दिली नाही आणि निवडणुकीतील घोडेबाजार टाळण्यासाठी आपण हा निर्णय घेतल्याची कबुली बाळ माने यांनी दिली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) उमेदवार अनिकेत तटकरे यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला.

## शासन निर्णयाची होळी

कोल्हापूर : राज्य सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला असला, तरी त्याची अंमलबजावणी विधान परिषद निवडणुकीनंतर करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला आहे; जाचक अटींमुळे कर्जमाफी ही शेतकऱ्यांवर अन्यायकारक ठरणार त्याचा आरोप केला जात आहे. याच निर्णयाविरुद्ध कोल्हापुर येथे अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

# महाराष्ट्र बोर्डाची डिजिटल क्रांतीकडे वाटचाल

## दहावी–बारावी परीक्षांमध्ये मोठा बदल ! आता प्रश्न पत्रिका थेट ई–मेलवर

तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षा व्यवस्थेत मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक, वेगवान आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रश्नपत्रिका थेट ई-मेलद्वारे परीक्षा केंद्रांवर पाठविण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे प्रश्नपत्रिका छपाई, वाहतूक आणि सुरक्षेशी संबंधित अनेक अडचणींवर मात होणार असल्याचे मानले जात आहे.

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ आणि राज्य शिक्षण मंडळ यांच्यात मुंबईतील मुख्यालयात झालेल्या संयुक्त सहविचार बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीला राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी, सचिव डॉ. दीपक माळी तसेच महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. नवीन प्रणालीअंतर्गत प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्याच्या काही मिनिटांपूर्वी संबंधित परीक्षा केंद्रांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर पाठविण्यात येतील. त्यानंतर केंद्रप्रमुखांच्या देखरेखीखाली आवश्यक त्या संख्येत प्रश्नपत्रिकांची छपाई केली जाईल आणि विद्यार्थ्यांना त्यांचे वितरण केले जाईल. यामुळे प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीसाठी लागणारा वेळ, खर्च आणि सुरक्षेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. तसेच प्रश्नपत्रिका दीर्घकाळ साठवून ठेवण्याची आवश्यकता राहणार नसल्याने गळतीच्या घटनांवरही प्रभावी नियंत्रण मिळवता येणार असल्याचे शिक्षण मंडळाचे मत आहे.

# नाशिकमध्येही बोगस जन्म-मृत्यू दाखल्यांचे रॅकेट ?



तभा वृत्तसेवा

नाशिक :मालेगाव आणि नंदुरबारमध्ये उघडकीस आलेल्या बोगस जन्म दाखल्यांच्या प्रकरणानंतर आता नाशिकमधील जन्म-मृत्यू नोंदींवरहीसंशयाची छाया पडली आहे. शहरात अशा प्रकारचे गैरप्रकार घडले आहेत का, याचा सखोल शोध घेऊन संशयास्पद नोंदींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे केली. आज गुरुवारी किरीट सोमय्या यांनी महापालिका मुख्यालयात आयुक्त खत्री यांची भेट घेऊन या संवेदनशील विषयावर चर्चा केली. जन्म-मृत्यू दाखल्यांमधील दुरुस्तीच्या नावाखाली गैरप्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नमूद करत सोमय्या म्हणाले की, अशा प्रत्येक अर्जाची मूळ कागदपत्रांच्या आधारे काटेकोर पडताळणी झाली पाहिजे. तपासणीत कुठलीही संशयास्पद नोंद आढळल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करावी. दरम्यान, महापालिका प्रशासन लवकरच जन्म-मृत्यू नोंदींचे डिजिटायझेशन करण्याच्या तयारीत आहे. या प्रक्रियेदरम्यान जुन्या व नव्या सर्व नोंदींची बारकाईने तपासणी करूनच डिजिटल रेकॉर्ड तयार करावेत, अशी मागणीही सोमय्या यांनी केली.विशेष म्हणजे, शहरातील बोगस जन्म-मृत्यू नोंदींच्या संभाव्य गैरव्यवहाराबाबत सोमय्या यांचा हा पहिलाच पाठपुरावा नाही. काही महिन्यांपूर्वी त्यांनी तत्कालीन महापौर हिमगौरी आहेर-आडके यांची भेट घेऊन यासंदर्भात विशेष मोहीम राबविण्याची मागणी केली होती. त्यानंतर आता आयुक्त मनीषा खत्री यांच्याशी चर्चा करून त्यांनी हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणला आहे. शहरातील जन्म-मृत्यू नोंदींची विश्वासार्हता टिकवण्यासाठी आणि संभाव्य गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या चर्चेवेळी अतिरिक्त आयुक्त अमित रंजन, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय देवकर, भाजप शहराध्यक्ष सुनील केदार तसेच गटनेते ड. श्यामबडोदे उपस्थित होते.




# महाराष्ट्रात उद्योगांची भरभराट!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि IKEA सीईओंची उच्चस्तरीय बैठक!




तभा वृत्तसेवा

मुंबई :महाराष्ट्राला देशातील गुंतवणुकीचे अव्वल राज्य बनवण्यासाठी राज्य सरकारने आता रिटेल आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (४ जून) स्वीडनची आघाडीची आंतरराष्ट्रीय फर्निचर कंपनी 'आयकीया इंडिया' (खघए-खपवळर) चे मुख्य कार्यकारी अधिकारी पॅट्रिक अँटोनी यांची मुंबईतील आपल्या अधिकृत शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या अत्यंत महत्त्वाच्या आणि उच्चस्तरीय बैठकीत 'आयकीया'च्या महाराष्ट्रातील आगामी विस्तार योजनांवर अत्यंत सकारात्मक चर्चा झाली असून, कंपनी आगामी काळात राज्यात कोट्यवधी रुपयांची मोठी गुंतवणूक करण्यास सज्ज झाली आहे.

या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या अधिकृत 'द' सोशल मीडिया हँडलवरून या बैठकीचे फोटो शेअर करत महाराष्ट्रातील जनतेला ही आनंदाची बातमी दिली. मुख्यमंत्र्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले, मुंबईतील शासकीय निवासस्थानी आयकीया इंडियाचे सीईओ पॅट्रिक अँटोनी यांची भेट घेऊन विविध विषयांवर संवाद साधताना अत्यंत आनंद झाला. आमची ही चर्चा प्रामुख्याने 'आयकीया'च्या महाराष्ट्रातील व्यवसाय विस्तार आणि नव्या मोठ्या गुंतवणुकीच्या योजनांवर केंद्रित होती. विशेष बाब म्हणजे, ही कंपनी महाराष्ट्रातील स्थानिक कारागीर आणि हस्तकला उद्योगांना सोबत घेऊन काम करत आहे, त्यांच्या या कौतुकास्पद प्रयत्नांचे मी मनापासून स्वागत करतो. मुख्यमंत्र्यांच्या या विधानावरून आगामी काळात राज्यातील हजारो तरुणांना थेट आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.परवडणाऱ्या किमतीत, आधुनिक डिझाईन आणि अत्यंत दर्जेदार होम फर्निचर तसेच लाइफस्टाइल उत्पादनांसाठी जगभरात 'आयकेईए'चे मोठे नाव आहे. कंपनीने ९ ऑगस्ट २०१८ रोजी हैदराबादमधील हायटेक सिटी परिसरात आपले भारतातील पहिले स्टोअर सुरू करून भारतीय बाजारपेठेत पाऊल ठेवले होते.

या पहिल्याच स्टोअरला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादानंतर कंपनीने आपला मोर्चा महाराष्ट्राकडे वळवला. डिसेंबर २०२० मध्ये नवी मुंबईत कंपनीचे दुसरे आणि महाराष्ट्रातील पहिले अवाढव्य स्टोअर सुरू झाले. त्यानंतर मुंबईकरांच्या पसंतीस उतरत कंपनीने वरळी येथे आपले विशेष 'सिटी स्टोअर' सुरू केले. पुढे २२ जून २०२२ रोजी बंगळुरूत चौथे, तर नुकतेच मार्च २०२६ मध्ये पुण्यात पाचवे भव्य स्टोअर सुरू करून कंपनीने आपला विस्तार वेगाने वाढवला आहे.

# देवगिरी व्हॅली सोसायटीची निवडणूक बिनविरोध

## परिसर विकासासाठी नागरिकांच्या अपेक्षा



अध्यक्ष कैलास आव्हाळे | उपाध्यक्ष सनी पितळे | सचिव अशोक कमोदकर | कोषाध्यक्ष मुक्तेश्वर पवार | उपसचिव भगिनाथ पवार

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : शहरातील देवगिरी व्हॅली को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीची निवडणूक प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध पार पडली. सुमारे ४०० सभासद असलेल्या आणि शहरातील प्रमुख सोसायट्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवगिरी व्हॅली सोसायटीच्या निवडणुकीकडे नागरिकांचे विशेष लक्ष होते. मागील महिनाभर सुरू असलेली निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली.

निवडणूक अधिकारी व सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या निवड प्रक्रियेत कैलास आव्हाळे यांची अध्यक्षपदी, सनी सेठ पितळे यांची उपाध्यक्षपदी, अशोक कमोदकर यांची सचिवपदी, मुक्तेश्वर पवार यांची कोषाध्यक्षपदी तर भागिनाथ पवार यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली.

तसेच शिवसिंग कुकलारे, दिनकर वाघमारे, भारत निकम, केशव सूर्यवंशी, मनोज मत्ते, प्रवीन हिवाळे, शोभा सुनील तुपे, ताराबाई भास्कर शेजवळ, सत्यवान बादाडे, किरण थोरात, किशोर लाहोट आणि मधुसूदन झांबरे यांची संचालक म्हणून बिनविरोध निवड झाली.

काही सभासद इच्छुक असूनही सर्वांनी समंजस भूमिका घेतल्याने निवडणूक शांततेत आणि एकमताने पार पडल्याची भावना व्यक्त करण्यात आली. दरम्यान, पालकमंत्री संजय शिरसाट, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास मस्के आणि पडेगाव शिवसेना प्रमुख राहुल येल्दी यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालकांचे अभिनंदन केले. तसेच परिसरातील विकासकामांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. नव्या कार्यकारिणीकडून सोसायटीच्या विकासासाठी प्रभावी कामकाजाची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# क्रांती चौकात 6 जूनला भव्य शिवराज्याभिषेक सोहळा; गुणवंत विद्यार्थी व शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा होणार गौरव

## शिवकालीन युद्धकला, तलवारबाजी स्पर्धा, पालखी सोहळा आणि पारंपरिक राज्याभिषेकाची आकर्षक मांडणी





तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शनिवारी (दि. ६ जून) सकाळी ८.३० वाजता क्रांती चौक येथे भव्य शिवराज्याभिषेक सोहळा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात मनपा शाळांतील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा विशेष गौरव करण्यात येणार असल्याची माहिती शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना शहरप्रमुख बाळासाहेब थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला यंदा ३५३ वर्षे पूर्ण होत असून हा ऐतिहासिक दिवस नव्या पिढीपर्यंत पोहोचावा आणि शिवचरित्रातून प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात येत आहे. गेल्या पाच वर्षांपासून ही परंपरा अखंडित सुरू असून यंदाही हजारो शिवभक्त आणि सर्वपक्षीय मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावर्षीच्या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे कोल्हापूर येथील शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिक. झी मराठीवरील प्रसिद्ध कलाकार संदीप जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हे सादरीकरण होणार आहे. याशिवाय जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत.

३५३ वर्षांपूर्वीच्या राज्याभिषेक सोहळ्याची अनुभूती देण्यासाठी मेघडंबरी, हत्ती, भालदार, चोपदार, तोफा यांची आकर्षक मांडणी केली जाणार आहे. विशेष पंडितांच्या मंत्रोच्चारात दुग्धाभिषेक व जलाभिषेक करून शिवरायांना अभिवादन केले जाईल. गंगा नदीचे पाणी तसेच विविध नद्या व गडांवरील पवित्र जल यासाठी वापरण्यात येणार आहे. ढोल-ताशांच्या गजरात महाराजांना मानवंदना देण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून कार्यक्रमस्थळापर्यंत पालखी मिरवणूक काढण्यात येणार असून दांडपट्टा, तलवारबाजी व युद्धनीतीची प्रात्यक्षिकेही सादर केली जातील.

या कार्यक्रमास शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे, शिवसेना उपनेते व संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शिवबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर कापरे यांच्यातर्फे मिठाई वाटप, श्रीसाई सेवा मंडळाचे संदीप पाटील यांच्याकडून पालखीचा मान, तर जिल्हासंघटक आशा दातार यांच्या वतीने भजनी मंडळाची व्यवस्था करण्यात आली आहे. पत्रकार परिषदेस नगरसेवक सचिन खैरे, सतीश कटकटे, शेख रब्बानी, गणेश सुरे, संदेश कवडे, विनायक देशमुख, प्रितेश उर्फ बंटी जैस्वाल, संजय हरणे, नारायण मते, सुरेश पवार, अभिजित थोरात यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

# बकरी ईदपूर्वी 131 गोवंश जनावरे जप्त; पोलिस आयुक्त प्रविण पवार यांचा भाजप अल्पसंख्याक मोर्चाकडून सत्कार



तभा वृत्तसेवा,

छत्रपती संभाजीनगर : बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहर पोलिसांनी प्रभावी कारवाई करत जवळपास १३१ गोवंश जनावरे जप्त केली. पोलिस आयुक्त प्रविण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. तसेच बकरी ईदचा सण शहरात शांततापूर्ण आणि सलोख्याच्या वातावरणात पार पडल्याने पोलिस प्रशासनाच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

गोवंश जप्ती प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत गंभीर कलमे लागू करण्यात आली आहेत. संबंधित आरोपींसह त्यांच्या संघटित गुन्हेगारी टोळीविरुद्ध कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू असून येत्या काही दिवसांत या प्रकरणात पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली. या उल्लेखनीय कारवाईबद्दल भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष सलीम चिश्ती यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलिस आयुक्त प्रविण पवार यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी मोहम्मद शफी, अदनान अहमद, नदीम खान, अतिक खान, विजय बसवाल, दशरथ पाईकराव, नासिर सिद्दिकी आणि याकुब शेख यांची उपस्थिती होती.

शहरातील शांतता, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने केलेल्या कार्याचे कौतुक करत शिष्टमंडळाने पोलिस दलाचे आभार मानले. तसेच भविष्यातही अशाच प्रभावी कारवायांद्वारे शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक बळकट करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# दरवाढ, बेरोजगारी विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवेदन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ जून : पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून बेरोजगारी,कांद्याला मिळणारा अपुरा भाव आणि सर्वसामान्यांच्या वाढत्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दि.१ सोमवार रोजी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात इंधन दरवाढीमुळे शेतीचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच शेतकरी हिताचे निर्णय तातडीने घ्यावेत, पेट्रोल-डिझेलच्या दरांवर नियंत्रण आणावे, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात आणि शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी शासनाच्या धोरणांविरोधात नाराजी व्यक्त करत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वाक्षरीयुक्त निवेदन सादर केले. मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल, असा इशाराही देण्यात आला.

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडी पूर्व तालुकाध्यक्ष सचिन शिंदे, वंचित बहुजन आघाडी पश्चिम तालुकाध्यक्ष गणेश सोनवणे मनोहर जगताप, दिलीप सुरवाडे, शिवराम जाधव, जितेंद्र मगरे, बाळू बेदवे, शरद नावकर, सुमित मगरे, भारत नावकर, सागर श्रीखंडे, अनंत बनकर, अरुण पारके, देवनाथ जाधव यांच्यासह आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जगद्धात्री-शिवायच्या नात्याला नवे वळण; लग्नाचा सोहळा रंगणार?



तभा वृत्तसवा

छत्रपती संभाजीनगर, झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' मालिकेत आता प्रेक्षकांना एक मोठे आणि भावनिक वळण पाहायला मिळणार आहे. मालिकेने नुकतेच २०० भाग पूर्ण करत यशस्वी टप्पा गाठला असून जगद्धात्री आणि शिवाय यांच्या नात्याविषयीची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे.

अलीकडेच मालिकेतील प्रमुख कलाकार सोनाक्षी बत्रा आणि फर्मान हैदर यांनी सामाजिक माध्यमांवर एक फोटो शेअर केला. या छायाचित्रात शिवाय जगद्धात्रीच्या कपाळावर कुंकू लावताना दिसत असल्याने त्यांच्या नात्याचा नवा अध्याय सुरू होणार का, याबाबत चाहत्यांमध्ये चर्चा रंगली आहे.

मालिकेच्या कथेनुसार, देशमुख वाड्यात प्रवेश मिळवण्यासाठी जगद्धात्री आणि शिवाय यांनी पती-पत्नी असल्याचे नाटक केले होते. मात्र काळाच्या ओघात त्यांच्यात विश्वास, समजूतदारपणा आणि भावनिक जवळीक निर्माण झाली. त्यामुळे हे नाते आता केवळ एका मिशनपुरते मर्यादित राहिलेले नाही.

सोनाक्षी बत्रा हिने सांगितले की, आगामी भागांमध्ये प्रेक्षकांना बहुप्रतीक्षित क्षण पाहायला मिळणार असून शिवाय आपल्या मनातील भावना व्यक्त करणार आहे. तर फर्मान हैदरच्या मते, त्यांच्या नात्याचा हा नवा टप्पा प्रेक्षकांसाठी भावनिक आणि संस्मरणीय ठरणार आहे.

# सिल्लोड नगर परिषदेने शेतकऱ्यांची लूटमार थांबवावी



सिल्लोड प्रतिनिधी : नगरपरीषदेच्या माध्यमातुन दलाल शेतकऱ्यांची लुटमार करीत असल्याचा आरोप भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मकरंद कोर्डे यांनी केला असुन लुटमार थांबविण्याची मागणी नगरपरीषदेच्या मुख्याधीकारी यांचेकडे केली आहे.

मकरंद कोर्डे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे की आ.अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखालील व समीर सत्तार नगराध्यक्ष असलेल्या सिल्लोड नगर परिषदेच्या माध्यमातुन करवसुलीच्या नावाखाली सिल्लोड शहरात शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लुट करण्यात येते.आ.अब्दुल सत्तार हे शेतकऱ्यांशी संपर्क

साधताना संवाद करताना शेती व शेतकऱ्यांच्या विकासाची भाषणे देतात.परंतू तेच शेतकरी त्यांच्या नेतृत्वाखालील, सिल्लोड नगर परीषद हद्दीत भाजीपाला विकण्यासाठी येतात तेव्हा त्यांची माणसे शेतकऱ्यांची लुटमार करीत असल्याचा आरोप प्रसिध्दी पत्रकात करण्यात आला आहे.यात पुढे म्हटले आहे की तालुक्यातील व तालक्याबाहेरचे शेतकरी सिल्लोड शहरात दररोज भाजीपाला विक्रीसाठी घेऊन येतात. मोठ्या प्रमाणात आणलेला भाजीपाला ठोक भावात किरकोळ विक्रेते व ग्राहकांना विकण्यात येतो. या भाजीपला विकणाऱ्या शेतकऱ्यांकडुन अव्वाच्या सव्वा भावाने दलाल पैसे उकळतात. छोटा हत्ती किंवा त्यासारख्या वाहनांमधुन आणलेल्या भाजीपाल्याच्या एका गाडीचे दिडशे,दोनशे किंवा अडीचशे रुपये असे कितीही पैसे घेण्यात येतात. कॅरेटमध्ये असलेल्या फळभाज्यांसाठी प्रती कॅरेट दहा रुपये दलाल घेतात. टमाट्याच्या पन्नास कॅरेटसाठी पाचशे रुपये द्यावे लागल्यास कधी कधी खर्चही निघत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगीतले.किरकोळ विक्रेत्यांनी सिल्लोडच्या भाजी मंडईत भाजी विकल्यास त्यांचेकडुन पुन्हा करवसुलीच्या नावाने पैसे घेतल्या जातात.एकाच भाजीसाठी दोनदा पैसे उकळून लुट केल्या जाते.विशेष म्हणजे घेतलेल्या पैशांची पावती

दिल्या जात नाही.त्यामुळे नगरपरीषदेने भाजीपाला विक्रीसाठी नेमके काय दर ठरविले आहेत हे समजू शकत नाही.त्यामुळे शेतकऱ्यांना मोठी झळ सहन करावी लागत आहे.नफ्यात घट होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.शेतकऱ्यांकडुन कमी भावात घेऊन, ग्राहकांना मात्र चढ्या भावाने भाजीपाला विकण्यात येतो.त्यामुळे शेतकरी व ग्राहकांची लुट करुन दलाल करीत आहेत. सिल्लोड शहरातील भाजी मंडईत जाऊन त्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# पथदर्शी प्रकल्प: मोबाईल ॲपद्वारे खत वितरण; तक्रार निवारणासाठी तालुकानिहाय हेल्पलाईन सुविधा

छत्रपती संभाजीनगर, दि.४(जिमाका)- राष्ट्रीय खत विक्री आराखड्यानुसार मोबाईल ॲपद्वारे खत नोंदणी व वितरण करण्यासाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल', चा पथदर्शी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविला जात आहे. शुक्रवार दि.५ पासून हा प्रकल्प कार्यान्वित होत आहे. याबाबत शेतकऱ्यांना काही तक्रार, अडीअडचणी वा शंकानिरसन करावयाचे असल्यास त्यासाठी तालुकानिहाय अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे,असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी व जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील यांनी कळविले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या तालुकानिहाय नेमलेल्या अधिकाऱ्यांशी त्यांच्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा,असेही आवाहन करण्यात आले आहे.शेतकऱ्यांच्या तक्रारी, अडीअडचणी निवारणासाठी नियुक्त अधिकारी व त्यांचे संपर्क क्रमांक याप्रमाणे-

**जिल्हास्तरीय हेल्पलाईन :** पंकज अण्णासाहेब ताजणे- ९४०४३०३१२८, हरिभाऊ सिताराम कातोरे- ९१८५२२०४३५

**तालुकास्तरीय हेल्पलाईन :** छत्रपती संभाजीनगर- गोविंद रामकिशन पौळ-९७६३७१५०४, दिनकर आनंदराव जाधव-९४२१३११४१२, पैठण- राधाकृष्ण लक्ष्मण कार्ले-९४२२२२९८१८,संतोष अर्जून जाधव-९८५०१८१६२३, फुलंब्री- शांतिलाल दामोधर हिवराळे-७५८८७९३०३५,रामराव मारोतराव बेम्बरे-८८३०४५२७०७, वैजापूर- रविंद्र अशोक उराडे-९४२०४९०३७६,जगदीप ज्ञानबा वाघमारे-७५८८०८९६७४

# जी.डी.सी.ए. व सी.एच.एम. परीक्षेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र परीक्षार्थीने हस्तगत करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.४(जिमाका)- सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था ,पुणे यांच्यामार्फत दिनांक २३, २४ व २५ मे २०२५ रोजी जी.डी.सी.आणि सी.एच.एम. परीक्षा २०२५ देवगिरी महाविद्यालय येथे ही परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला प्राप्त झाले आहेत. परीक्षार्थींनी आपली गुणपत्रके व प्रमाणपत्रे दिनांक ३० जून २०२६ पर्यंत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात स्वतः समक्ष हजर राहून हस्तगत करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच, ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२२, २०२३ व २०२४ मधील परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र अद्याप कार्यालयात येऊन नेलेले नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांनी देखील तात्काळ कार्यालयात समक्ष येऊन आपली प्रमाणपत्रे हस्तगत करावीत, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# 'डाक अदालत' चे ८ जून रोजी आयोजन; तक्रारी नोंदवण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर,दि,४(जिमाका)- देशातील पोस्टल सेवा ही नागरिकांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. पोस्ट खाते नेहमीच ग्राहकांना उत्तम सेवा देण्याचा आणि त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करत असते. याचाच भाग म्हणून दि.८ जून २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता पोस्टमास्तर जनरल यांच्या कार्यालयात 'डाक अदालत' आयोजित करण्यात आली आहे.

सेवा देताना काही वेळा त्रुटींमुळे किंवा संवादामुळे ग्राहकांच्या तक्रारी निर्माण होतात. या तक्रारींचा योग्य प्रकारे न्यायनिवाडा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी 'डाक अदालत' घेण्याचे ठरवले आहे. या अदालतीमध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी थेट ग्राहकांच्या तक्रारी सोडवण्याचा प्रयत्न करतात. छत्रपती संभाजीनगर क्षेत्राशी संबंधित टपाल सेवेविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण गेल्या ६ आठवड्यांच्या आत झालेले नसेल आणि ग्राहकाला समाधानकारक उत्तर मिळाले नसेल, अशाच तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल.

# रेल्वे स्टेशन चौक परिसरातील अज्ञात मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.४(जिमाका)-रेल्वे स्टेशन चौक आऊट गेट सिग्नल येथील रोड डिव्हायडरवर बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या एका अनोळखी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. याप्रकरणी वेदांत नगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलिसांनी या अज्ञात मृत व्यक्तीच्या वारसांचा शोध घेण्यासाठी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १७ मे २०२६ रोजी रेल्वे स्टेशन चौक परिसरातील रोड डिव्हायडरवर वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे असलेला एक इसम बेशुद्ध अवस्थेत आढळून आला होता. त्याला तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला मृत घोषित केले. या मृत व्यक्तीचे वर्णन मध्ये वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे.उंची अंदाजे ५ फूट. रंग काळा-सावळा.

**चेहरा लांबट गोल, नाक सरळ, डोळे काळे, डोक्यावर टक्कल आहे.अंगावरील कपडे:** निळ्या रंगाचे जॅकेट आणि राखाडी (ग्रे) रंगाची पँट.या वर्णनाच्या व्यक्तीबाबत किंवा त्याच्या नातेवाईकांबाबत काहीही माहिती मिळाल्यास तातडीने वेदांत नगर पोलीस ठाणे किंवा सहायक फौजदार एन. डी. गुजर (मोबाईल क्र. ९९२३२४९७९२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.आर.एस. तापडिया साहेब दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्रमांक: १८२ / २०२६ — पु. ता. 22/6/2026

अर्जदार : १) अलका भ. मगन पगारे वय- ५९ वर्ष, धंदा घरकाम, रा. घर नं.५ श्रीयेश अकॅंडे, ४३, रेस्ट कॅम्प रोड देवळाली कॅम्प, नाशिक, ता. जि. नाशिक. २) विनोद पि. मगन पगारे, वय ३७ वर्ष, धंदा खाजगी नोकरी, रा. ए १-७०४ चारोळी बुद्रुक ओप्पोसीते डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग चारोळी बुद्रुक पुणे ता.जि.पुणे. ३) दीपा पि. मगन पगारे, वय- ३५ वर्ष, धंदा- खाजगी नोकरी, रा. आनंद योगध्नौरनं. १०३, साकोरे नगर, विमाननगर पुणे, ता. जि.पुणे. ४) पवन पि. मगन पगारे, वय ३४ वर्ष, धंदा खाजगी नोकरी, रा. ई-६०४, कोहिनुर विवा सिटी, डी.एन. परांडे मार्ग, धानोरी पुणे सिटी, पो. धानोरी ता. जि. पुणे

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

मा. महोदय,

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ पी. एस. जाधव यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत मगन बन्सी पंगारे यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मोठा मुलगा आहे, अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे, व अर्जदार क्र. ४ हा लहान मुलगा आहे. अर्जदार क्र. १ हीचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील मयत मगन बन्सी पगारे हे होते, ते अल्पशा आजाराने दिनांक १९/१२/२०२५ रोजी मौजे रा.ए-१-७०४ चारोळी बुद्रुक ओप्पोसीते, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग चारोळी बुद्रुक, पुणे ता.जि. पुणे. येथे मयत झालेले आहे. सोबत त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. मयत मगन बन्सी पगारे यांना अर्जदार क्र. १ ते ४ यांच्याशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाही, त्यांचे आई वडील हे यापूर्वीच मयत झालेले आहे. अर्जदार यांना मयत मगन बन्सी पगारे यांना मिळणारा शासकीय, निमशासकीय, लाभ घेण्यासाठी अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. अर्जदार यांना मयत मगन बन्सी पगारे यांची शेती ही मौजे औराळा ता. कन्नड येथे असल्याने अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र हे शासकीय, व निमशासकीय, तसेच तलाठी कार्यालयात महसुल दप्तरी, तसेच ग्रामपंचायत कार्यालयात वारसांची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनांचे लाभघेण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदार हे वारसप्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद अधिका-यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र दिनांक १५/०४/२०२६ रोजी घेवुन येण्याचे सांगितल्यावरुन सदरील अर्ज दाखल करण्यास कारण घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार, वारसप्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०४/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.एन.आर. ढोके साहेब दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्रमांक: १५२ / २०२६ — पुढील तारीख २५ /०६/२०२६

अर्जदार : सुरैय्या बेगम शेख बाबू वय ५२ वर्ष, धंदा घरकाम, रा. एन-५ सी-१ आरसी १८, सह्याद्रीनगर, लोकसेवा पिठाच्या गिरणी जवळ एन-५ सिडको ता. जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : १) कडूबी भ. महेबुब शेख वय ६० वर्ष, धंदा- शेती, रा बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. २) शेख लतीफ शेख महेबुब, वय ४५ वर्ष, धंदा शेती, रा-बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३) शेख शकील शेख महेबुब, वय ४२ वर्ष, धंदा- शेती, रा-बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४) शेख इक्बाल शेख महेबुब, वय-४० वर्ष, धंदा- शेती, रा- बनशेंद्रा ता. कन्नड जि.औरंगाबाद.

अर्ज : कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

मा. महोदय,

ज्या अर्थी अर्जदारहीने त्यांचे विधिज्ञ पी. एस. जाधव यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार ही मयत महेबुब शेख सांडू यांची मुलगी असुन गैरअर्जदार क्र. १ दुसरी पत्नी असुन २ ते ३ हे मुल आहे. मयत महेबुब शेख सांडू यांचे दोन लग्न झालेले असुन त्यांची पहिली पत्नी सुग्राबी ही होती, तिच्यापासुन मयत महेबुब शेख सांडू यांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ हे झालेले आहे, मयतें महेबुब शेख सांडू यांची पत्नी सुग्रांबी ही दिनांक ०३/०७/१९६३ रोजी मयत झाल्याने त्यांनी दुसरा विवाह हा गैरअर्जदार क्र.१ कडूबी यांच्याशी केलेला असुन त्यांच्यापासुन गैरअर्जदार क्र. ३ व ४ हे झालेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील व गैरअर्जदार क्र. १ हीचे पती महेबुब शेख सांडू हे दिनांक २९/०१/१९७६ रोजी मौजे बनशेंद्रा ता. कन्नड येथे मयत झालेले आहे, ते बनशेंद्रा ता. कन्नड येथील कायमचे रहिवाशी असल्याने त्यांची शेती ही मौजे बनशेंद्रा ता. कन्नड येथे आहे. ते बनशेंद्रा येथे मयत झालेले असल्याने त्यांच्या मृत्युची नोंद ही ग्रामपंचायत कार्यालय बनशेंद्रा येथे असल्याने त्यांनी दिलेले मृत्युप्रमाणपत्र सोबत दाखल करीत आहे. मयत महेबुब शेख सांडू यांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्याशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाही, मयताचे आई वडील हे यापूर्वीच मयत झालेले आहे. त्यांच्या मृत्युची नोंद ही ग्रामपंचायत कार्यालय बनशेंद्रा येथे केलेली नाही. तसेच मयत महेबुब शेख सांडू यांची पहिली पत्नी व अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ यांची आई नामे सुग्राबी ही देखील तिच्या माहेरी मौजे गंदेश्वर येथे दिनांक ०३/०७/१९६३ रोजी मयत झालेली आहे सोबत तिचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करत आहे, अर्जदार हीस मयत महेबुब शेख सांडू यांची शेती ही मौजे बनशेंद्रा ता. कन्नड येथे असल्याने त्यांचे वारस म्हणून तलाठी, तसेच महसुल दप्तरी, व इतर शासकीय, व निमशासकीय, तसेच तसेच ग्रामपंचायत कार्यालयात वारसांची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनांचे लाभ घेण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदार ही वारसप्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद महसूल अधिका-यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येण्याचे सांगितल्यावरुन सदरील अर्ज दाखल करण्यास कारण घडले. त्याअर्थी सदर जाहीर नोटीसव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसप्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (३०) दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/०५/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.एन.आर. टोके साहेब दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्रमांक: ५७७ / २०२५

पुढील तारीख 16/6/2026

अर्जदार : १) चंद्रकलाबाई भ. वाल्मिक आहिरे वय ६२ वर्ष, धंदा घरकाम, रा. शिरोडी ता. कन्नड जि. औरंगाबाद.ह.मु. आव्हाड चाळ, मोरवाडी नाशिक, ता. जि. नाशिक. २) ज्ञानेश्वर पि. वाल्मिक आहिरे, वय ३९ वर्ष, धंदा खाजगी नोकरी, रा. शिरोडी ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. गामने चाळ, मोरवाडी नाशिक, ता. जि. नाशिक. ३) दत्तात्रय पि. वाल्मिक आहिरे, वय ३६ वर्ष, धंदा खाजगी नोकरी, रा. शिरोडी ता. कन्नड जि. औरंगाबाद, ह.मु. नं.१, श्रीहर संकुल गजानन नगर, अंबड, नाशिक, ता. जि. नाशिक. ४) दर्शन पि. वाल्मिक आहिरे, वय ३० वर्ष, धंदा खाजगी नोकरी, रा. शिरोडी ता. कन्नड जि. औरंगाबाद, ह.मु. नं.१, श्रीहर संकुल गजानन नगर, अंबड, नाशिक ता. जि. नाशिक. ५) अशा भ्र. संजय गायकवाड, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम.रा. गल्ली नं. ३ रुम नं. ११९ पोलीस मुख्यालय, नाशिक ता. जि. नाशिक.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

मा. महोदय,

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ पी.एस. जाधव यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत वाल्मिक देवराम आहिरे यांचे कायदेशीर वारस असुन अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे, २ ते ४ हे मुल असुन ५ ही मुलगी आहे. तसेच मयताचे आई वडील हे सुध्दा मयत झालेले आहे, अर्जदार क्र. १ हीचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील मयत वाल्मिक देवराम आहिरे हे अल्पशा आजाराने दिनांक २८/०९/२०२१ रोजी मौजे नं.१, श्रीहर संकुल गजानन नगर, अंबड, नाशिक, ता.जि. नाशिक. येथे मयत झालेले आहे, मयत वाल्मिक देवराम आहिरे यांची शेती ही मौजे शिरोडी ता. कन्नड येथे असल्याने अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र हे शासकीय, व निमशासकीय, तलाठी कार्यालय, तसेच महसुल दप्तरी, तसेच ग्रामपंचायत कार्यालयात वारसांची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनांचे लाभ घेण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदार हे वारसप्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद अधिका-यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येण्याचे सांगितल्यावरुन सदरील अर्ज दाखल करण्यास कारण घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसप्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (३०) दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०३/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

जा.क्र./जे-३/२४६०/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर.
दि. 25 MAY 2026

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.**

चौकशी अर्ज क्रमांक: जे-३/२८७/२०२६

कलम :- १९

न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: पूज्य उबावडो सिंधी पंचायत छत्रपती संभाजीनगर, व्दारा अमर शहीद कंवरराम सेवाधारी ट्रस्ट छ. संभाजीनगर, १४५, शिवाजी सिंधी को-ऑप. हौ. सो., छत्रपती संभाजीनगर....

अर्जदार :- चिरंजीलाल नानकराम बजाज

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मालमत्ता (वर्णन) रुपये- ११०००/-

ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारेखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक २५/०५/२०२६ रोजी दिली असे.

न्यायशाखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

# कामचुकार पोलिस पाटलावर निलंबनाची कारवाई- उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा दणका

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** गावात वास्तव्यास नसणे, कर्तव्याकडे दुर्लक्ष करणे आणि समाधानकारक खुलासा सादर न केल्याप्रकरणी जिंतूर तालुक्यातील हांडी येथील पोलिस पाटील अमोल विठ्ठलराव राठोड यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केली असून प्रशासनाच्या या कठोर भूमिकेची तालुक्यात चर्चा रंगली आहे.

प्राप्त माहितीनुसार, तालुक्यातील हांडी येथील पोलिस पाटील अमोल राठोड हे गावात नियमित वास्तव्यास राहत नसल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे वारंवार प्राप्त होत होत्या. पोलिस पाटील हे गावात राहत नसून पुणे व नाशिक येथे खासगी नोकरी करत असल्याची गोपनीय व विश्वासार्ह माहिती प्रशासनाला मिळाली होती. पोलिस पाटील हे गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच शासन आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत असतात. मात्र संबंधित पोलिस पाटील गावातच अनुपस्थित राहत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत सहाय्यक पोलिस निरीक्षक बामणी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली असता संबंधित पोलिस पाटील गावात राहत नसल्याचे आढळून आले. त्यानंतर त्यांनी सविस्तर अहवाल उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर केला. या अहवालाच्या आधारे अमोल राठोड यांना नोटीस बजावण्यात आली. मात्र, नोटीसला दिलेला खुलासा प्रशासनाच्या दृष्टीने असमाधानकारक ठरल्याने उपविभागीय दंडाधिकारी शैलेश लाहोटी यांनी मंगळवारी(दि. २)आदेश काढून अमोल विठ्ठलराव राठोड यांना पोलिस पाटील पदावरून निलंबित केले. या कारवाईमुळे पोलिस पाटील पदावरील जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी लागणार असल्याचा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे. गावातील नागरिकांच्या समस्या, कायदा व सुव्यवस्था तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी पोलिस पाटील गावात उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने अधोरेखित केले आहे.

स्थानिक स्तरावर या निर्णयाचे स्वागत होत असून, कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि पदाधिकाऱ्यांवर प्रशासन कठोर भूमिका घेत असल्याचे यामुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### दुचाकीसह कृषी पंप चोरीच्या गुन्ह्याची उकल : दुचाकीसह ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या दुचाकी आणि शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीवरून ३० मे रोजी केलेल्या कारवाईत आरोपी रोहित सुरेश पवार आणि शेख मुजम्मील यांना ताब्यात घेण्यात आले.

चौकशी दरम्यान आरोपीने परभणी, जिंतूर, पूर्णा, चुडावा, पिंपळदरी, पाथरी आणि भोकर जि. नांदेड पोलीस ठाणे हद्दीत दुचाकी आणि शेतकऱ्यांचे पाण्यातील कृषीपंप चोरी केल्याची कबुली दिली. यावेळी आरोपीकडून परभणी ग्रामीण पोलिसांच्या गुन्ह्यातील १३ हजार रुपये, जिंतूर पोलिसांच्या गुन्ह्यातील १६ हजार रुपये, पूर्णा पोलिसांच्या गुन्ह्यातील १० हजार रुपये, चुडावा पोलिसांच्या गुन्ह्यातील १२ हजार रुपये, पिंपळदरी पोलिसांच्या गुन्ह्यातील १६ हजार रुपये, पाथरी पोलिसांच्या गुन्ह्यातील १३ हजार रुपये आणि भोकर जि. नांदेड पोलिसांत दाखल असलेल्या गुन्ह्यातील हिरो होंडा शाइन कंपनीची दुचाकी आणि रोख रक्कम ३० हजार रुपये असा एकूण ८२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलीस उपनिरीक्षक परिहार, पोलीस अंमलदार मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, रंगनाथ दुधाटे, महेश पांगरकर, सचिन भदर्गे, जमीर फारुखी, प्रमोद पुरी, उमर, गजानन क्षीरसागर, रफिक शेख, हनुमान ढगे व उत्तम हनवते यांनी मिळून केली.

### अवैध पिस्तुलासह संशयित आरोपी जेरबंद; स्थानिक गुन्हा शाखेची कारवाई; एक जिवंत काडतूस व मोबाईल हस्तगत

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरात स्थानिक गुन्हा शाखेचे पथक गस्तीवर असताना एका संशयितास अवैध पिस्तुलासह ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत पिस्तूल, जिवंत काडतूस आणि मोबाईल फोन असा एकूण ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव शेख मुजम्मिल शेख सरफराज असे असून तो कुर्बान अलीशाह नगर परिसरातील रहिवासी आहे. पोलिसांनी संशयिताची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून २० हजार रुपये किमतीचे एक पिस्तूल, एक जिवंत काडतूस तसेच १० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन असा एकूण ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलीस उपनिरीक्षक परिहार तसेच मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, रंगनाथ दुधाटे, महेश पांगरकर, सचिन भदर्गे, जमीर फारोकी, प्रमोद पुरी, उमर, गजानन क्षीरसागर, रफिक शेख, हनुमान ढगे आणि उत्तम हनवते यांच्या पथकाने केली.

### 'आपली परभणी, स्वच्छ परभणी' फाउंडेशनचे आयुक्तांना निवेदन : तुंबलेल्या नाल्या, सिंगल युज प्लास्टिक, ई-वेस्ट व कचरा व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा

**परभणी,/प्रतिनिधी :** 'आपली परभणी, स्वच्छ परभणी' फाउंडेशनच्या वतीने महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांना विविध मागण्यांचे निवेदन बुधवारी सादर करण्यात आले. यावेळी शहरातील स्वच्छता व नागरी सुविधांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

निवेदनात प्रामुख्याने शहरातील तुंबलेल्या नाल्यांची समस्या, सिंगल युज प्लास्टिकचा वापर, कचरा घंटागाडीचे नियोजन, रस्त्यावरील पथदिव्यांची व्यवस्था तसेच ई-वेस्ट व्यवस्थापन या विषयांचा समावेश होता. या सर्व मुद्द्यांवर आयुक्तांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी 'आपली परभणी, स्वच्छ परभणी' या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व स्वच्छताविषयक उपक्रमांची माहितीही आयुक्तांना दिली. शहर अधिक स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक करण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या प्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राहूल आंबेगावकर, संस्थापक सदस्य पराग चौधरी, डॉ. संदीप कार्ले, डॉ. मयूर आष्टीकर, अशोक डुकरे, नंदू परांडकर, दत्ता कदम आणि दीपक कासंडे उपस्थित होते. फाउंडेशनच्या विविध मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन आयुक्तांनी दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### गाढवाला हार घालुन कर्जमाफीचा निषेध; सोनपेठातील शेतकऱ्यांचे अनोखे आंदोलन : शासनाच्या अध्यादेशाची केली होळी

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात जाहीर केलेल्या अध्यादेशात विविध अटी-शर्ती लादून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप करत सोनपेठ येथील शेतकऱ्यांनी बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन केले. यावेळी शासनाच्या अध्यादेशाची जाहीर होळी करण्यात आली, तसेच गाढवाला शाल, टोपी, हार व श्रीफळ अर्पण करून निषेध व्यक्त करण्यात आला.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कर्जमाफीसंदर्भात जाहीर करण्यात आलेल्या अध्यादेशात नेहमीप्रमाणे अनेक अटी व निकष घालण्यात आल्याने लाखो शेतकरी कर्जमाफी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या योजनेचा लाभ केवळ मोजक्याच शेतकऱ्यांना मिळणार असल्याने तरुण शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी एकत्र येत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शासनाच्या अध्यादेशाची होळी केली. तसेच फसवी कर्जमाफी जाहीर केल्याच्या निषेधार्थ गाढवाला शाल, टोपी, हार व श्रीफळ अर्पण करून अनोख्या पद्धतीने शासनाचा निषेध नोंदविला. या आंदोलनात भारत राष्ट्र किसान समितीचे सुधीर बिंदू, शेतकरी संघटनेचे नेते गणेश पाटील, विश्वंभर गोरवे, ऋषिकेश जोगदंड, काँग्रेसचे सैफुल्ला सौदागर, राजेश जोगदंड, किरण सोळंके, मंगेश जोगदंड, राहुल रोडे, नारायण फफाळ, चंद्रकांत नाईकनवरे, माधव जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

## आडगाव बाजारात अवेळी भारनियमनाविरोधात आत्मदहनाचा इशारा

**परभणी,/प्रतिनिधी-** मौजे आडगाव बाजार (ता. जिंतूर) येथील ३३ केव्ही उपकेंद्रावरून सुरू असलेल्या अवेळी भारनियमनामुळे नागरिक त्रस्त झाले असून, भारनियमनाच्या वेळेत तातडीने बदल करून सुधारित वेळापत्रक लागू करावे, अन्यथा ८ जून रोजी आत्मदहन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रल्हाद दाभाडे यांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता, परभणी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, आडगाव बाजार येथील ३३ केव्ही उपकेंद्रावरून अडचणीच्या वेळेत घेतले जाणारे भारनियमन नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

दरम्यान, ६ जून २०२६ पर्यंत प्रभावी उपाययोजना न झाल्यास ८ जून रोजी आडगाव येथील ३३ केव्ही उपकेंद्र कार्यालयासमोर परिसरातील नागरिकांसह आत्मदहन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान काही अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे निवेदन प्रल्हाद रामकिसनराव दाभाडे, माजी चेअरमन वि.वि.का.से.स. संस्था तथा प्रल्हाद दाभाडे मित्र मंडळ यांच्या वतीने देण्यात आले असून, त्याच्या प्रती जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक तसेच महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## डस्टबीन अनिवार्य

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील व्यापारी, दुकानदार, फळविक्रेते व भाजी विक्रेत्यांनी आपल्या दुकानासमोर अनिवार्यपणे डस्टबिन ठेवावे तसेच घरातील ओला व सुका कचरा घंटागाडीत टाकावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## प्राचार्य डॉ. के. के. पाटील यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात

**परभणी,/प्रतिनिधी :** शिरसाळा येथील श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयात ३१ मे रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. पाटील यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. आपल्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या प्राचार्य पाटील यांच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. आ. व्यंकटराव कदम होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव योगेश कदम, संचालिका सौ. लता कदम, संचालक भगवान मोहिते, बापूराव भुसारे, अक्षय कदम तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अर्धापूर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अजय टेंगसे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पूज्य श्री पार्डीकर महाराज तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## मुदतपूर्व कार्यादेश रद्द करण्यास हायकोर्टाचा ब्रेक एसटी महामंडळाला नोटीस; मेहतर समाज संस्थेला दिलासा..

**परभणी ,/प्रतिनिधी-** राज्य परिवहन महामंडळाने मुदतपूर्व रद्द केलेल्या कार्यादेशप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वाचा अंतरिम दिलासा दिला आहे. संबंधित कामकाजात हस्तक्षेप न करण्याचे निर्देश देत न्यायालयाने एसटी महामंडळाला १६ जूनपर्यंत उत्तर सादर करण्याची नोटीस बजावली आहे.

मेहतर समाज सामाजिक शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष कमल रमेश कडोसे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती सिद्धेश्वर एस. ठोंबरे यांनी सोमवारी हा आदेश दिला. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. योगेश वि. जायभाये यांनी बाजू मांडली. धुळे विभागातील नंदुरबार, तळोदा व शहादा बसस्थानक परिसरात 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या तत्वावर प्रवाशांसाठी प्रसाधनगृहे उभारण्याचे कार्यादेश संस्थेला देण्यात आले होते. संबंधित करारांचा कालावधी अनुक्रमे १४ फेब्रुवारी २०१९ ते १३ ऑगस्ट २०३३, २५ मार्च २०२५ ते २४ जानेवारी २०४० आणि १० फेब्रुवारी २०२३ ते ९ जुलै २०३७ असा होता. मात्र कराराची मुदत संपण्यापूर्वीच काही त्रुटींचा ठपका ठेवत कोणतीही पूर्वसूचना न देता कार्यादेश रद्द करण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांनी स्वखर्चाने काम पूर्ण करूनही अचानक आदेश रद्द केल्याने अन्याय झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यावर सुनावणी घेताना न्यायालयाने प्रतिवादी एसटी महामंडळाला नोटीस बजावत, तूर्तास दिलेले कामाचे आदेश रद्द न करण्याचे तसेच तिसऱ्या पक्षाचे हक्क निर्माण न करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, अशा स्वरूपाच्या प्रकरणात राज्यात प्रथमच औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती दिल्याचा दावा याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला आहे. या आदेशामुळे राज्यातील तत्सम संस्थांना दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ॲड. योगेश जायभाये यांनी यापूर्वीही विविध शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या सेवा विषयक प्रकरणांत न्यायालयात बाजू मांडत अनेकांना दिलासा मिळवून दिला आहे.



परभणी- मराठवाड्यातील सर्व रेल्वे स्टेशनसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देऊन विकास करण्याची मागणी डॉ. शिवाजी शिंदे यांनी केली असून यावेळी बैठकीत उपस्थित असलेले अधिकारी व पदाधिकारी दिसत आहेत.

## हायवाच्या धडकेत पोलीस शिपायाचा दुर्दैवी मृत्यू

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** येथील शहरातील ताडकळस टी-पॉईंट परिसरात एका भरधाव हायवा टिप्परच्या धडकेत दुचाकीवरील एका पोलीस शिपायाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी पुर्णा पोलीसांत हायवा चालकांविरुद्ध निष्काळजीपणाने वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवराम मन्मथ आष्टुरकर (पोलीस शिपाई बक्कल नं.१३५, पोलीस मुख्यालय परभणी) असे त्या मयत पोलीस शिपायाचे नाव आहे. ते रविवारी परभणीहून पुर्णा मार्गाने आपल्या दुचाकी क्र. (२६//९७०५) ने जात होते. दरम्यान, सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पूर्णा येथील ताडकळस टी-पॉईंटवरील वळणाजवळ पिवळ्या रंगाच्या १० हायवा टिप्पर क्र. (२६/ / ३६७३) ने त्यांच्या मोटारसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिली.या अपघातात शिवराम आष्टुरकर गंभीर जखमी झाले. घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी तातडीने त्यांना ग्रामीण रुग्णालय पूर्णा येथे उपचारासाठी दाखल केले.प्रकृती चिंताजनक असल्याने येथील डॉक्टरांनी त्यांना प्राथमिक उपचार करून त्यांना नांदेड येथील हलविण्यात आले. उपचारादरम्यान रात्रीच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेची माहिती शिवराम यांचे भाऊ गजानन मन्मथ आष्टुरकर (रा. पेठशिवनी, ता. पालम, जि. परभणी) यांनी पूर्णा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीनुसार, भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत मोटारसायकलला धडक दिल्यानंतर वाहन घटनास्थळी सोडून पसार प्रकरणी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास फौजदार श्रीनिवास पडलवार हे करीत आहेत.

## लाभार्थ्यांनीच केली रोजगार सेवक व इतरांविरुद्ध तक्रार;

### बनावट मजूर नोंदीद्वारे शासन निधी अपहाराचा संशय; चौकशी व फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी

**जिंतूर ,/प्रतिनिधी:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या वैयक्तिक सिंचन विहिरीच्या कामामध्ये कोणतेही प्रत्यक्ष काम न करता परस्पर मस्टर तयार करून शासन निधीचा अपहार करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील लाभार्थी असलेल्या शेतकरी दत्ता हिरामण राठोड यांनीच संबंधित रोजगार सेवक, ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, तांत्रिक कर्मचारी तसेच अन्य संबंधितांविरुद्ध पंचायत समिती जिंतूर येथे लेखी तक्रार दाखल करून सखोल चौकशी व दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, मौजे टाकळखोपा येथील गट क्रमांक १६३ मधील शेतजमिनीसाठी दत्ता राठोड यांच्या पत्नी सौ. शीला दत्ता राठोड यांच्या नावे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीर मंजूर करण्यात आली होती. सदर कामाचा सांकेतांक क्रमांक १८१७०१५११५//१२३५२९०९९० असा आहे.

मात्र, प्रत्यक्षात विहिरीचे कोणतेही खोदकाम अथवा काम झाले नसताना संबंधित रोजगार सेवक, ग्रामविकास अधिकारी अथवा ग्रामसेवक, तांत्रिक कर्मचारी तसेच सचिन कैलास सांगळे यांनी संगनमत करून लाभार्थ्यांच्या नकळत परस्पर मस्टर तयार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, मस्टरमध्ये प्रत्यक्ष काम न केलेल्या व्यक्तींची नावे मजूर म्हणून दाखविण्यात आली असून त्या आधारे शासनाकडून मजुरीची रक्कम काढण्यात आली आहे. त्यामुळे शासन निधीचा अपहार, खोट्या नोंदी व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, संबंधित रोजगार सेवक यांनी स्वतःचे तसेच त्यांच्या शालेय शिक्षण घेत असलेल्या मुलाचे नावदेखील मजूर म्हणून मस्टरमध्ये दाखवून मजुरीची रक्कम घेतल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. हा प्रकार सिद्ध झाल्यास रोजगार हमी योजनेच्या नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाल्याचे स्पष्ट होणार आहे.

तक्रारदार दत्ता राठोड यांनी नमूद केले आहे की, दिनांक १३ मे २०२६ रोजी या प्रकाराबाबत संबंधितांकडे विचारणा केली असता त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची, घर जाळून टाकण्याची तसेच गंभीर परिणाम भोगण्याची धमकी देण्यात आली. त्यामुळे त्यांच्या कुटुंबामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून जीवितास धोका निर्माण झाल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी तक्रारदारांनी संबंधित कामाचे मस्टर, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), तांत्रिक मान्यता, हजेरीपत्रके, एफटीओ नोंदी, बँक व्यवहार यांची चौकशी करण्याबरोबरच प्रत्यक्ष स्थळ पंचनामा करून विहिरीचे काम झाले आहे की नाही याची खातरजमा करण्याची मागणी केली आहे.

तसेच दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचारी व इतर व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (), भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व शासन निधी अपहारासंदर्भातील इतर लागू कायद्यांनुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक जिंतूर तसेच संबंधित बँक प्रशासनालाही माहितीस्तव पाठविण्यात आली आहे. आता लाभार्थ्यांनीच केलेल्या या गंभीर तक्रारीची पंचायत समिती प्रशासन व संबंधित यंत्रणा कितपत निष्पक्ष चौकशी करतात आणि शासन निधीच्या संभाव्य अपहार प्रकरणात कोणती कारवाई करतात याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## अग्रलेख...

# कर्जमाफीच्या पल्याड जायला हवे...

महाराष्ट्र सरकारने राज्यातील ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांना थेट लाभ देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'ला अधिकृत मंजुरी दिली आहे. ही घोषणा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षाचे औचित्य साधत, त्यांच्या नावाने जाहीर केली गेली हे स्तुत्य आणि भावनिकदृष्ट्याही सकारात्मक आहे. राजमाता अहिल्यादेवी यांचे संपूर्ण आयुष्य वंचित, शोषित आणि विशेषतः काळ्या मातीत घाम गाळणाऱ्या बळीराजाच्या कल्याणासाठी समर्पित राहिले. त्यांच्या मनात शेतकऱ्यांविषयी अतीव कणव होती. शेतीच्या विकासासाठी त्यांनी विहिरी, बारवा आणि तलावांची निर्मिती केली, दुष्काळात शेतकऱ्यांचा महसूल माफ केला आणि पिढ्यान्‌पिढ्या शेती करणाऱ्या कुळांना संरक्षण दिले. तत्कालीन महसूल अधिकारी शेतकऱ्यांवर जुलूम करीत होते, तेव्हा अहिल्यादेवींनी मध्यस्थी करून शेतकऱ्यांना न्याय दिला. अशा महान, प्रजाहितदक्ष मायमाउलीच्या नावाने ही योजना सुरू होणे, हा महाराष्ट्राच्या कृषी परंपरेसाठी शुभसंकेत मानला पाहिजे.

राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती बिकट आहे. खरे तर, बिकट स्थिती त्यांच्या पाचवीलाच पूजली आहे. सातत्याने हवामान पावसाचा लहरीपणा, हवामान बदलाचे संकट, कधी कोरडा दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, या साऱ्यांमुळे शेती करणे म्हणजे जणू जुगार खेळण्यासारखे आहे. कशाचीही निश्चिती नाही, शाश्वती नाही. आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ-उतार आणि उत्पादन खर्चाच्या तुलनेत पिकाला न मिळणारा भाव यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पेरणीसाठी घेतलेले कर्ज फेडणे तर दूरच; कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, असा प्रश्न महाराष्ट्रातल्या लाखो शेतकऱ्यांसमोर आ वासून उभा आहे. या चक्रव्यूहातून बाहेर पडू न शकल्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असतात. अशा गंभीर आणि विदारक स्थितीत शेतकऱ्यांना तत्काळ सरकारकडून मदतीची गरज होतीच. त्यामुळे दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज सरसकट माफ करण्याचा आणि नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय अगदी योग्य वेळी आला आहे. कारण येणारा पावसाळा फारसा आश्वस्त करणारा नाही, असा वेधशाळेचा अंदाज आहे. त्यामुळे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची ही तरतूद शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा हलका करणारी ठरेल, अशी आशा करू या.

लोकशाही व्यवस्थेत संकटसमयी नागरिकांच्या, विशेषतः अन्नदात्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, त्यांचे अश्रू पुसणे ही सरकारची नैतिक आणि घटनात्मक जबाबदारी आहे. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करीत हा निर्णय घेतला, ही नक्कीच स्वागतार्ह बाब आहे. जेथे देशातील उद्योगपतींचे लाखो-कोटी रुपयांचे कर्ज बुडित खात्यात टाकले जाते किंवा थेट माफ केले जाते, तेथे देशाचा कणा असलेल्या शेतकऱ्याला कर्जमाफी मिळणे हा त्याचा हक्क ठरतो. सरकारनेही आपली जबाबदारी ओळखून ५५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना थेट लाभ देण्याचा संकल्प सोडला. आचारसंहिता संपताच, म्हणजेच १८ जूननंतर पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम वर्ग केली जाणार आहे. शेतकऱ्यांना हवा असलेला तातडीचा दिलासा महत्त्वाचा आहेच. परंतु, हे असे किती काळ चालू शकेल, हाही प्रश्न आहेच. २००८ ची केंद्र सरकारची कर्जमाफी, २०१७ ची 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१९ ची महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणि आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना. सरकारे बदलतात, योजनांची नावे बदलतात. हजारो कोटी रुपये खर्च होतात. ते फेडायला सरकार पुन्हा कर्ज घेते आणि तरीही शेतकरी कायमचा कर्जमुक्त का होत नाही? बळीराजा पुन्हा पुन्हा कर्जबाजारीपणाच्या त्याच दुष्टचक्रात का अडकतो? आणि त्याच्यासाठी दुष्काळात कायम तेरावा महिनाच का असतो? अशा प्रश्नांची उत्तरेही शोधायला हवीत. कर्जमाफी हे या कर्जबाजारीपणाच्या व्याधीवरचे कायमस्वरूपी औषध नव्हेच. फार फार तर तो तात्पुरता केलेला उपचार आहे. वैद्यकीय उपचारात वेदनाशामक औषधांचे जे महत्त्व आहे, तेच शेतकऱ्यांच्या समस्यांच्या अनुषंगाने कर्जमाफीचे. कर्जमाफीमुळे शेतकऱ्याला तात्पुरता दिलासा मिळतो. त्याची वेदना तात्पुरती शमते. पण, या औषधाचा डोज उतरला की स्थिती पुन्हा जैसे थे. जोपर्यंत शेती फायद्याची होत नाही, जोपर्यंत शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कमी होत नाही आणि जोपर्यंत त्याच्या शेतमालाला रास्त भाव आणि पर्यायाने नफा मिळत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणाच्या विळख्यातून सुटका होण्याची शक्यता नाही. या प्रश्नांची तड लागेपर्यंत कर्जमाफीच्या योजनांची पुनरावृत्तीही होत राहील. पण, वेदनाशामक औषधे किंवा प्रतिजैविकेही फार जास्त देता येत नाहीत. तसेच कर्जमाफीचे आहे. कधी तरी शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक उग्र झालेले असतील आणि कर्जमाफी देण्याची सरकारची क्षमता संपून जाईल. तो दिवस येऊ नये म्हणून आता तरी उपाय सुरू केले पाहिजेत. सिंचनाची सोय, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शीतगृहांची साखळी आणि मध्यस्थांची फळी मोडीत काढून थेट बाजाराशी शेतकऱ्याला जोडावे लागेल. पूरक व्यवसायांचे जाळे उभे करावे लागेल. शेतकऱ्यांना मानसिक बळही द्यावे लागेल. हे उपाय तसे नव्याने सुचविण्याचे कारण नाही. सर्वांना सारे काही कळते. वळत नाही, हाच मुद्दा आहे. अनेक समित्या गठित झाल्या. त्यांचे अहवाल आलेत. सर्व अहवालांत या व अशा उपाययोजना दिलेल्या आहेत. पण त्यांच्या अंमलबजावणीचे काय? शेतकऱ्यांचे भले करण्याच्या नावावर अनेक योजना येतात, जातात. वारंवार कर्जमाफी करावी लागते. कर्जमाफी हे यश नव्हे तर आपल्या व्यवस्थेचे अपयश आहे, हे सरकारला समजले पाहिजे. शेतकऱ्यांना कुणाच्या दारावर उभे राहणे आवडत नाही. शेतकऱ्यांची दैना शासनालाही बघवत नसणार. महायुती शासनाला शेतकऱ्यांविषयी ममत्व आहे, असे जाणवते. या ममत्वाला वास्तवाच्या नजरेने पाहिले पाहिजे. कारण, यातून प्रश्न सुटत नाहीत. ते रेंगाळतात. स्थिती अधिक बिकट होत राहते. मंत्रिमंडळाने काल-परवा घोषित केलेल्या बहुतांश योजना किंवा अलिकडच्या काळातील अनेक मोठ्या घोषणा या कर्ज घेतल्याशिवाय पूर्ण होणार नाहीत, अशाच आहेत. आज रोजी महाराष्ट्रावर ६.५ लाख कोटी रुपयांहून अधिकचे कर्ज आहे. राज्याच्या उत्पन्नातील बराच हिस्सा हा या कर्जाचे व्याज फेडण्यात जात आहे. सरकारने नवीन कर्ज काढायचे आणि ते पैसे भांडवली विकासासाठी न वापरता अनुदाने, मोफत योजना आणि कर्जफेडीसाठी वापरायचे, हे राज्याच्या अर्थकारणासाठी फार चांगले नाही. लोकशाही ही कल्याणकारी व्यवस्था असली तरी पैशाचे सोंग फार काळ आणता येत नाही. कर्जाऊ रकमेतून अशा योजना राबविणे ही तात्कालिक गरज असू शकते. सरकारच्या लोकप्रियतेसाठीही त्याचा फायदा होतो. पण दीर्घकालीन आर्थिक आरोग्यासाठी ते धोकादायक आहे. भविष्यात रस्ते, सिंचन प्रकल्प, वीज आणि आरोग्यासारख्या मूलभूत सोयींसाठी पैसा कुठून येणार, याचाही विचार सरकारने केला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने घेतलेला शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय सद्यस्थितीत आवश्यकच होता, यात वाद नाही आणि तो बळीराजासाठी दिलासादायक ठरेल, यात शंका नाही. मात्र, धोरणकर्त्यांनी अशा तात्पुरत्या उपायांच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना युद्ध पातळीवर केल्या पाहिजेत. ज्या असोशीने राज्य सरकार उद्योगांसाठी धावते, गुंतवणूक आणण्यासाठी धडपडते, तसे ते शेतकऱ्यांसाठी कधीच धावपळ करताना दिसत नाही. शेतकऱ्यांच्या स्वावलंबनासाठी शाश्वत व्यवस्था कधी ना कधी निर्माण करावी लागेलच. कर्जमाफीच्या पल्याड जाऊन काम करावे लागेल. कृषीविषयक धोरणात आमूलाग्र बदल करून आणि नव्या धोरणाची अंमलबजावणी निगुतीने करूनच स्थिती सुधारू शकते. तसे प्रयत्न झाले तरच अहिल्यादेवींच्या स्वप्नातील समृद्ध, सुखी आणि कर्जमुक्त शेतकरी आपल्याला बघता येईल. अन्यथा कर्जमाफीच्या समाधानाचे किंवा आनंदाचे इमले कधीच टिकाऊ नसतात, हा इतिहास ताजाच आहे..

## विशेष

### कमोडोर एस. एल. देशमुख

# दक्षिण चीन समुद्रावर गैरवाजवी मालकी

दक्षिण चीन समुद्र हा जागतिक व्यापाराच्या भवितव्याचा व आशियातील सत्तासंतुलनाचा कस पाहणारा प्रदेश बनला आहे. शतकानुशतके महासत्तांना एक साधे सत्य माहीत होते- जो समुद्रांवर नियंत्रण ठेवतो, तो राष्ट्रांच्या भविष्याची दिशा ठरवतो. २१ व्या शतकात हे सत्य दक्षिण चीन समुद्राच्या खाऱ्या पाण्यात नव्या तीव्रतेने समोर आले आहे. जागतिक व्यापाराच्या महत्त्वाच्या वाहिन्या ज्या विशाल सागरी मार्गातून जातात, तो हा प्रदेश आहे. आज तो जगातील सर्वात महत्त्वाच्या भूराजकीय संघर्षबिंदूंपैकी एक बनला आहे. जागतिक स्तरावर व्यापारी मालाच्या होणाऱ्या जवळपास चार पंचमांश वस्तूंची वाहतूक या समुद्रमार्गे होते. कच्चे तेल, द्रविभूत नैसर्गिक वायू, मोटारी, इलेक्ट्रॉनिक्स, धान्य, औषधी कच्चा माल आणि इतर उत्पादित ९० टक्के वस्तू ज्या आधुनिक जीवनावश्यक आहेत या सागरी व्यापारमार्गांवर अवलंबून आहेत. या सागरी मार्गांमध्ये दक्षिण चीन समुद्रातून जाणारे मार्ग विशेष महत्त्वाचे आहेत. जगातील सागरी व्यापारापैकी जवळपास एक चतुर्थांश व्यापार या समुद्रातून होतो. या मार्गात दीर्घकालीन अडथळा निर्माण झाल्यास त्याचे परिणाम केवळ पूर्व आशियापुरते मर्यादित राहणार नाहीत तर जगाची आर्थिक नाडी आवळली जाईल.

**चीनचे अवास्तव दावे :** जागतिक व्यापाराचे स्वरूप बदलत असल्याने या प्रदेशाचे महत्त्व आणखी वाढले आहे. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांना जोडणारे नवीन दक्षिण-दक्षिण व्यापार मार्ग वेगाने विस्तारत आहेत. आशियातील अंतर्गत व्यापारही सातत्याने वाढत आहे. त्यामुळे दक्षिण चीन समुद्र हा केवळ प्रादेशिक जलमार्ग न राहता बहुध्रुवीय जागतिक अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनला आहे. या तणावाच्या केंद्रस्थानी चीनचा व्यापक प्रादेशिक दावा आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने परिस्थिती स्पष्ट दिसते. २०१६ मध्ये हेग येथील आंतरराष्ट्रीय लवाद न्यायाधिकरणाने निर्णय दिला की, संयुक्त राष्ट्रांच्या समुद्र कायदा करारानुसार चीनच्या व्यापक दाव्यांना कोणताही कायदेशीर आधार नाही. मात्र, चीनने हा निर्णय स्पष्टपणे नाकारला आणि सैन्य, तटरक्षक दल व सागरी मिलिशियाच्या माध्यमातून आपली उपस्थिती अधिक मजबूत करीत इतर राष्ट्रांची सागरी संपत्ती लाटण्याचा कुटिल डाव रचला आहे.

गेल्या दशकात सामरिक परिस्थिती बदलली आहे. या बेटांवर धावपट्ट्या, क्षेपणास्त्र प्रणाली, रडार केंद्रे आणि नौदल सुविधा उभारण्यात आल्या आहेत. चिनी आणि फिलिपिनी जहाजांमधील चकमकी अधिक वारंवार आणि आक्रमक होत आहेत. त्यामुळे एखादी स्थानिक घटना मोठ्या संघर्षात परिवर्तित होण्याची भीती वाढली आहे. अमेरिकेने फिलिपाईन्सप्रति आपली सुरक्षा बांधिलकी अधोरेखित केली आहे आणि अतिशयोक्त सागरी दाव्यांना आव्हान देण्यासाठी नियमितपणे 'फ्रीडम ऑफ नेव्हिगेशन' मोहिमा राबविल्या आहेत. जपान, ऑस्ट्रेलिया आणि काही युरोपीय देशांनीही मुक्त सागरी व्यवस्थेला पाठिंबा देण्यासाठी आपली नौदल उपस्थिती आणि देखरेख वाढविली आहे. पण हे वरवरचे उपाय कुचकामी ठरले आहेत. दक्षिण चीन समुद्र हा केवळ चीन आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष नाही. अनेक देशांचे हितसंबंध त्यात गुंतले आहेत. भारतासाठीही या समुद्राचे प्रचंड सामरिक महत्त्व आहे.

**सागरी सुरक्षा :** पारंपरिकदृष्ट्या स्थलसीमांवर लक्ष केंद्रित करणारी शक्ती म्हणून ओळखला जाणारा भारत आता आपल्या आर्थिक भवितव्याचा सागरी सुरक्षेशी असलेला अविभाज्य संबंध ओळखू लागला आहे. भारताचा २०० अब्ज डॉलर्सहून अधिक किमतीचा व्यापार दक्षिण चीन समुद्र आणि मलाक्का सामुद्रधुनीतून जातो. मूल्याच्या दृष्टीने हा भारताच्या एकूण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या निम्म्याहून अधिक आहे. हे जलमार्ग भारताला जपान, दक्षिण कोरिया, चीन आदी राष्ट्रांसारख्या महत्त्वाच्या आर्थिक भागीदारांशी जोडतात. भारताच्या ऊर्जा आयातीतील मोठा भाग, विशेषतः कच्चे तेल आणि द्रविभूत नैसर्गिक वायू या मार्गांद्वारे येतो. याच मार्गांमुळे भारताच्या वाढीसाठी आवश्यक असलेले इलेक्ट्रॉनिक्स, औषधी कच्चा माल, औद्योगिक कच्चा माल आणि उत्पादित वस्तूंचा पुरवठा होतो. म्हणूनच दक्षिण चीन समुद्रातील नौवहन स्वातंत्र्य हा नवी दिल्लीसाठी दूरचा राजनैतिक विषय नसून एक महत्त्वाचा राष्ट्रीय हितसंबंध आहे. चीनने वादग्रस्त प्रदेशांचे केलेले लष्करीकरण आणि आंतरराष्ट्रीय सागरी नियमांचे पूर्ण पालन करण्यास दाखवलेली अनिच्छा याबद्दल भारताने सातत्याने चिंता व्यक्त केली आहे. विविध राजनैतिक मंचांवर भारताने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आधारे सागरी वाद सोडविण्यावर भर दिला आहे. याचबरोबर भारतीय नौदलाने इंडो-पॅसिफिक प्रदेशात आपली कार्यात्मक उपस्थिती वाढविली आहे. दक्षिण चीन समुद्रातील नियमित तैनाती भारताच्या आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण आणि प्रादेशिक स्थैर्यात योगदान देण्याचा निर्धार दर्शवतात. भारताने आग्नेय आशियाई देशांशी सुरक्षा भागीदारीही मजबूत केली आहे. विशेषतः फिलिपाईन्सला ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली पुरवून त्याला मदत केली आहे. या पावलांमधून भारत या प्रदेशात अधिक सक्रिय सामरिक भूमिका स्वीकारण्यास तयार असल्याचे दिसून येते. आशियामध्ये चीनचा आर्थिक प्रभाव अत्यंत व्यापक आहे.

भारताची प्रभाव क्षमता संसाधनांच्या मर्यादा, देशाजवळील इतर सामरिक प्राधान्यांमुळे व आंतरिक राजकारणामुळे काही प्रमाणात मर्यादित आहे. या वास्तवांमुळे भारताला दक्षिण चीन समुद्राविषयीची आपली रणनीती सतत परिष्कृत करावी लागणार आहे. हा उद्दिष्ट संघर्ष नसून धोरणात्मक लवचीकता जपण्याचा मार्ग आहे. व्यापार मार्गांचे संरक्षण, भागीदारी बळकट करणे, आंतरराष्ट्रीय कायद्याला पाठिंबा देणे आणि कोणत्याही एका शक्तीला सागरी प्रवेशाच्या अटी एकतर्फी ठरवण्यापासून रोखणे हे महत्त्वपूर्ण आहे. अमेरिकेचे दिवंगत सिनेट र जॉन सी स्टेनिस यांनी एकदा म्हटले होते की, विविध नौदलांमधील सहकार्य हे उदयोन्मुख धोक्यांविरुद्ध सागरी सुरक्षेचे संरक्षण करण्याच्या सामूहिक निर्धाराचे प्रतीक आहे. वाढत्या भूराजकीय स्पर्धेच्या या युगात, समविचारी लोकतांत्रिक देशांसाठी दक्षिण चीन समुद्र हा आंतरराष्ट्रीय व्यवस्था जागतिक समृद्धी अवलंबून असलेल्या या महत्त्वाच्या जलमार्गांना खुले ठेवणे ही अग्निपरीक्षा आहे.

(लेखक निवृत्त नौदल तांत्रिक वैमानिकीय अधिकारी तसेच संरक्षण व भूराजकीय विश्लेषक आहेत. व्यक्त केलेली मते वैयक्तिक आहेत.)

## वेध

### पुंडलिक आंबटकर

# प्रतिकूल परिस्थितीतही अर्थव्यवस्था मजबूत

सध्या जगात अनेक ठिकाणी युद्धे सुरू आहेत. महायुद्ध झाले तर संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. परंतु, सध्या तरी महायुद्ध होण्याची शक्यता कुठल्याच अंगाने वाटत नाही. मात्र, छोट्या-मोठ्या युद्धांमुळे विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांवर गंभीर परिणाम होऊ लागले आहेत. जगात महागाईचा भडका उडाला असून अनेक देशांच्या अर्थव्यवस्था धोक्यात आल्या आहेत. याचा सर्वाधिक फटका गरीब देशांना बसत आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. परंतु, अमेरिका-इराण युद्धामुळे आयात-निर्यात धोरण विस्कळीत झाल्याने सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीवर परिणाम झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार भारताची अर्थव्यवस्था जगात सहाव्या क्रमांकावर आहे. मात्र, क्रयशक्ती समानतेचा आधार घेतला तर भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था ठरते. भारताच्या अर्थव्यवस्थेने ४ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा पार केला आहे आणि भारतीय अर्थव्यवस्था वाढीचा दर जगात पहिल्या क्रमांकावर आहे.

सध्या भारताकडे जवळपास ६६ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक परकीय चलन साठा उपलब्ध आहे. यात भारत चौथ्या क्रमांकावर आहे. आगामी काळात हा चलन साठा १ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेचे आहे. युद्धामळे रुपया कमकुवत होत आहे. ही बाब खरी असली तरी अशा स्थितीवर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.



आर्थिक वर्ष २०२५ मध्ये भारताची एकूण निर्यात ८२५.३ अब्ज डॉलर्सवर होती. हा आजपर्यंतचा एकप्रकारे विक्रम ठरला. हाच निर्यात दर २०२६ मध्येसुद्धा कायम राहिला. अमेरिकेने मोठ्या प्रमाणात व्यापार शुल्क लादूनही निर्यात २.४ टक्क्यांनी वाढली. २०२५ मध्ये थेट विदेशी गुंतवणूक ८१ अब्ज डॉलर्स इतकी नोंदविली गेली. विशेष म्हणजे, २०२६ मध्ये त्यात आणखी वाढ झाली. यावरून हेच सिद्ध होते की, जगाचा विश्वास भारतावर दिवसागणिक वाढत चालला आहे. इराण आणि अमेरिका युद्धामुळे कच्च्या खनिज तेलाच्या किमती प्रचंड वाढल्याने भारताचा विकासदर जवळपास १ टक्क्याने कमी होण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. भारताला गरजेच्या ८५ टक्क्यांवर कच्चे तेल आयात करावे लागते. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या. भारताची जवळपास ६०-८० टक्के एलपीजी आयात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. हा मार्ग बाधित झाल्याने टंचाई निर्माण झाली आहे. विमानांचे मार्ग बदलावे लागल्याने प्रवास महागला आहे. रासायनिक खतांच्या बाबतीतही हीच स्थिती आहे. भारत दरवर्षी सुमारे ७०० ते ८०० टन सोन्याची आयात करतो. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताने सुमारे ७२१ टन सोन्याची आयात केली. यातून तब्बल ६ लाख कोटी रुपये भारतातून विदेशात गेले. हा सर्व व्यवहार अमेरिकन डॉलर्समध्ये होत असल्याने भारतीय तिजोरीवर मोठा ताण येतो. त्यामुळे परकीय चलन वाचविण्यासाठी आगामी वर्षभर अनावश्यक सोने खरेदी टाळण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. सोबतच इंधन वाचविण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती त्यांनी केली आहे. नागरिकांकडून पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. विरोधकांकडून मात्र मोदी यांच्या आवाहनावर टीका होत आहे. १९६८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विदेशी चलन टंचाई रोखण्यासाठी गोल्ड कंट्रोल ॲक्ट कडक केला होता, ही बाब विरोधक आज सोयीस्करपणे विसरत आहेत. १४ कॅरेटपेक्षा अधिक गुणवत्तेच्या सोन्याचे दागिने घडविण्यावर त्याकाळी बंदी घालण्यात आली होती. खाद्यतेल निर्मितीत २०३१ पर्यंत आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न भारत सरकारचा आहे. परंतु, आज तरी भारताला आपल्या गरजेच्या ६० टक्क्यांपेक्षा अधिक खाद्यतेल आयात करावे लागते. भारत दरवर्षी सुमारे १४० ते १६० लाख मेट्रिक टन खाद्यतेल आयात करतो. भारताला दरवर्षी २५० लाख मेट्रिक टनापेक्षाही अधिक खाद्यतेलाची गरज भासते. या व्यवहारात देशाला जवळपास १.६१ लाख कोटी रुपये खर्च करावे लागतात. भारत पूर्वी शस्त्रास्त्र खरेदी करणारा प्रमुख देश होता. परंतु, या क्षेत्रातही आता भारत आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने अग्रेसर झाला असून शस्त्रास्त्र निर्यातीतून विदेशी चलन भारतात येऊ लागले आहे. अमेरिकेसारख्या देशाने शस्त्रास्त्रे आणि खनिज तेल विकूनच जगात आपला दबदबा राखला आहे. आता भारतही या स्पर्धेत उतरला असून आगामी २०४७ पर्यंत भारत सर्वच क्षेत्रात आत्मनिर्भर होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

९८८१७१६०२७

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# अखेर तृणमूल काँग्रेसमध्ये फूट

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवाच्या धक्क्यातून सावरण्याच्या आधीच ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. पश्चिम बंगाल विधानसभेत ममता बॅनर्जी यांनी शोभनदेव चट्टोपाध्याय यांना विरोधी पक्षनेता जाहीर केले होते. त्यांचा हा निर्णय पक्षातील बहुतांश आमदारांना मान्य नव्हता. त्यामुळे या आमदारांनी विधानसभेचे सभापती रवींद्रनाथ बोस यांना भेटून ऋतुब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेता करण्याची मागणी केली होती. या मागणीला तृणमूल काँग्रेसच्या ८० पैकी ६० आमदारांचा पाठिंबा होता. बहुमताच्या निर्णयाचा आदर करत सभापती बोस यांनी ऋतुब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता दिली. त्यामुळे तृणमूल काँग्रेसमध्ये उघडउघड फूट पडली आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडणार अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती, ती यामुळे प्रत्यक्षात आली आहे. ममता बॅनर्जी याच आमच्या नेत्या आणि सल्लागार असल्याचे बंडखोर गटाने म्हटले असले तरी तृणमूल काँग्रेस हा पक्ष आता त्यांच्या तावडीतून निसटला आहे, ही काळ्या दगडावरची रेघ म्हटली पाहिजे. या निर्णयाचे खापर भाजपावर फोडण्यापेक्षा ममता बॅनर्जी यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे.

२९४ सदस्यांच्या विधानसभेत भाजपाने २०८ जागा जिंकत इतिहास घडवला, तर तृणमूल काँग्रेसला ८० जागांवर समाधान मानावे लागले. मात्र हे आमदारही आपल्या एककल्ली वागणुकीमुळे ममतांना टिकवता आले नाही. मुख्यमंत्री असलेल्या ममता बॅनर्जी यांचा यावेळच्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा पराभव झाला. आता त्यांच्या पक्षाच्या आमदारांनीही त्यांना नाकारले आहे. विरोधी पक्षनेतेपदाबाबत त्यांनी घेतलेला निर्णय झुगारून दिला आहे. विशेष म्हणजे २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतही त्यांचा पराभव झाला होता, पण त्या पराभवानंतरही त्यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेता आली होती. पण यावेळच्या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांची स्थिती अधिक दयनीय आणि अगतिक झाली आहे. 'घर फिरले की घराचे वासे फिरतात', असे म्हटले जाते, याचा अनुभव आता ममता दीदींना येत आहे. मुख्यमंत्रिपदाच्या सलग तीन कार्यकाळात ममता बॅनर्जी यांची वागणूक आणि कार्यपद्धती मनमानी आणि एककल्ली होती. ती त्यांना आता भोवली आहे. खरं म्हणजे विरोधी पक्षांचे ८० आमदार ही संख्या कमी नाही. या आमदारांच्या भरवशावर ममता बॅनर्जीसारख्या आक्रमक नेत्याने राज्यातील शुभेन्दू अधिकारी सरकारला सळो की पळो करून सोडले असते. पण आता तृणमूलचे आमदारच ममता बॅनर्जी यांना सळो की पळो करत आहेत. ममता बॅनर्जी आपले भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या सल्ल्याने वागतात, निर्णय घेतात, असा तृणमूलच्या आमदारांचा आक्षेप होता. ममतांनी सर्वसहमतीने म्हणजे पक्षाच्या सर्व आमदारांशी चर्चा करून विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय घेतला असता, तर त्यांच्या पक्षातील फूट टळली असती. पण विनाशकाले विपरीत बुद्धीसारखी त्यांची स्थिती झाली. शोभनदेव चट्टोपाध्याय यांना विरोधी पक्षनेते करण्याचा निर्णय घेत ममता बॅनर्जी यांनी आपल्या पायावरच नाही तर पक्षावरही दगड पाडून घेतला. ममता बॅनर्जी यांच्यासारख्या नेत्याला पक्षात काय सुरू



आहे, याचा अंदाज आला नाही, याचे आश्चर्य वाटते. ऋतुब्रत बॅनर्जी आणि सांदिपन साहा या दोन आमदारांना पक्षातून निलंबित करत ममतांनी आपल्या हाताने पक्षातील फुटीचा पाया घातला, असे म्हणावेसे वाटते.

पश्चिम बंगालचे राजकारण महाराष्ट्रातील राजकारणाच्या पावलावर पाऊल टाकत आहे, असे म्हटले जात होते, ते तेथे घडून आले. शिवसेनेत जशी फूट पडली, तशी फूट तृणमूल काँग्रेसमध्ये पडेल अशी आंशका व्यक्त केली जात होती. ताज्या घटनाक्रमाने ती खरी ठरली. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेतून एकनाथ शिंदे ४० आमदारांसह बाहेर पडले होते. या बंडखोरीमुळे उद्धव ठाकरे यांचे सरकार कोसळत राज्यात भाजपाचे सरकार सत्तेवर आले. बंगालमध्ये तीनचतुर्थांश बहुमताचे भाजपाचे सरकार निवडणुकीच्या मार्गाने सत्तेवर आले आहे. त्यामुळे राज्यात भाजपाला सरकार स्थापन करण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या आमदारांची गरज नव्हती. तृणमूल काँग्रेसचे आमदार पक्षातून बाहेर पडत आपला गट हा मूळ तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करू शकतात, असे म्हटले जात होते, ते आता खरे ठरले आहे. तृणमूलच्या बंडखोर आमदारांनी आमचा गटच खरा तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करत ममता बॅनर्जी यांची झोप उडवली आहे. तृणमूल काँग्रेस विधिमंडळ पक्षात फूट पडल्यानंतर तृणमूलच्या संसदीय पक्षातही आता फूट पडू शकते.

विधानसभा निवडणुकीच्या आधी स्वतःला सर्वांत शक्तिमान नेता मानणाऱ्या ममता बॅनर्जी आता सर्वांत अगतिक, दयनीय आणि असहाय नेत्या वाटू लागल्या आहेत. अभिषेक बॅनर्जी आणि कल्याण बॅनर्जी यांच्यावरील हल्ल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी राजधानी कोलकात्यात धरणे आंदोलनाची घोषणा केली होती. काही दिवसांपूर्वी ममतांच्या तालावर नाचणाऱ्या कोलकाता पोलिसांनी राणी राशमोनी मार्गावर होणाऱ्या या धरणे आंदोलनाला परवानगी नाकारली. पण ममता बॅनर्जी पोलिसांचा बंदी आदेश झुगारून धरण्यावर बसल्या. पण त्यांची सर्वांत मोठी फजिती तेव्हा झाली, जेव्हा तृणमूलच्या ८० पैकी ७३ आमदारांनी या धरणे आंदोलनाकडे पाठ फिरवली.

याआधी ममता बॅनर्जी यांनी कालिघाट या आपल्या निवासस्थानी बोलावलेल्या आमदारांच्या बैठकीला ८० पैकी फक्त २० आमदार उपस्थित होते. ममता बॅनर्जी यांनी बोलावलेल्या बैठकीला आमदारांनी अनुपस्थित राहण्याची ही पहिली वेळ नव्हती. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आमदारांच्या पहिल्या बैठकीला दहा आमदारांनी दांडी मारली होती. दुसऱ्या बैठकीत ही संख्या ३५ आमदारांपर्यंत गेली. या आमदारांचा रोष हा ममता बॅनर्जी यांच्यापेक्षा त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्यावर होता. अभिषेक बॅनर्जी हे ममता बॅनर्जी यांच्यानंतर तृणमूल काँग्रेसमधील सत्तेचे दुसरे केंद्र होते. तृणमूल काँग्रेसची सत्ता असताना अभिषेक बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना आणि आमदारांना कस्पटासमान वागणूक दिली होती. त्याचा राग आता तृणमूल काँग्रेसच्या आमदारांच्या बंडखोर वागणुकीतून समोर आला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालाला एक महिनाही झाला नसताना तृणमूल काँग्रेसमध्ये पडलेली फूट ममता बॅनर्जींसाठी गंभीर धोक्याचा इशारा आहे. विधानसभा निवडणुकीत यदाकदा तृणमूल काँग्रेसला चौथ्यांदा सत्ता मिळाली असती आणि ममता बॅनर्जी यांनी चौथ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली असती तर त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा प्रचंड वाढल्या असत्या आणि त्यांना पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली असती. पण विधानसभा निवडणूक निकालांनी ममता बॅनर्जी यांना राज्यातील जनतेने जमिनीवर आणले आहे. ममता बॅनर्जी यांच्या पराभवाचा भाजपाला जेवढा आनंद झाला नसेल त्यापेक्षा जास्त आनंद काँग्रेसला झाला आहे. कारण ममता बॅनर्जी यांना चौथ्यांदा सत्ता मिळाली असती तर राष्ट्रीय राजकारणातील काँग्रेसचे राजकीय महत्त्व कमी झाले असते आणि ममता बॅनर्जी यांचे महत्त्व वाढले असते. पण ममतांच्या पराभवाने काँग्रेसच्या राजकीय अस्तित्वाला निर्माण होणारा संभाव्य धोका टळला आहे. त्यामुळेच तृणमूल काँग्रेसचे पानिपत झाल्यानंतर काँग्रेसचे राहुल गांधी यांनी पहिला दूरध्वनी ममता बॅनर्जी यांना करत एकप्रकारे त्यांच्या जखमेवर मीठ चोळले होते.

धरणे आंदोलनाच्या ठिकाणी 'ईश्वर अल्लाह तेरो नाम, सब को सन्मती दे भगवान' असे गीत ममता बॅनर्जी यांनी म्हटल्याचे वृत्त आहे. पण हे गीत म्हणायला ममतांनी खूप उशीर केला. आधीपासूनच हे गीत त्यांनी म्हटले असते, तर गुंडागर्दी करणाऱ्या तृणमूलच्या नेत्यांना सद्‌बुद्धी आली असती. ६० आमदार बाहेर पडल्यानंतर तृणमूल काँग्रेसला आपला मूळ पक्षाचा दर्जा आणि निवडणूक चिन्हही गमवावे लागण्याची शक्यता आता नाकारता येत नाही. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांचे जे राजकीय हाल झाले, तेच पश्चिम बंगालमध्ये आता ममता बॅनर्जी यांचे होणार आहे, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### सर्वसामान्यांना दिलासा हवा

एकीकडे अमेरिका-इराण आणि दुसरीकडे रशिया-युक्रेन, बलुचिस्तान -पाकिस्तान अशा सर्वत्र युद्धाच्या ज्वाळा उठल्या असताना दुसरीकडे या युद्धांच्या झळा मात्र जगातील कित्येक देशांतील सर्व सामान्य नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. त्यामुळे गेल्या महिनाभरात देशात तीन ते चार वेळा इंधन दर वाढले. पंतप्रधान काटकसर करण्याचा सल्ला देत असले तरी दैनंदिन जीवनावर या महागाईचा प्रभाव पडलेला आहे. शासकीय नोकरदार आणि व्यावसायिक यांना या महागाईची झळ तितकी पोहचत नसली तरी सर्वसामान्य मजूर, खाजगी नोकरदार वर्ग मात्र यामध्ये भरडला जात आहे.

खाद्यपदार्थांचे भाव गगनाला भिडले असल्याने सर्वांचेच बजेट कोलमडले आहे. तिथेच आता एसटीची भाववाढ पण अटळ आहे. याआधीच टॅक्सी, ऑटोचालकांनी दरवाढ केलेली आहे. पुढे जरी इंधनाचे भाव उतरले तर वरीलपैकी कुणीच आपले दर कमी करणार नाही. जेव्हा इंधनवाढ झाली म्हणून भाडे वाढविले जाते, तिथे इंधन दरात घसरण झाल्यावर कमी का केले जात नाही? या सर्वसामान्य नागरिकांना पडलेल्या प्रश्नाचे उत्तर सध्यातरी सरकारकडे नाहीच. यात फायदा मात्र पेट्रोलियम कंपन्यांचा होतो. आधीच काटकसर करून जगणाऱ्या सामान्य नागरिकांना या महागाईतून दिलासा मिळेल, असे काही केंद्रातून करायला हवे.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

### उपलब्ध जलसंपत्तीचे जतन, संवर्धन आवश्यक

नागपुरात जलक्रांती परिषद नुकतीच पार पडली, यांत मान्यवरांच्या मार्गदर्शनाने जलसंधारण, जलसंवर्धनाचे महत्त्व विशद करण्यात आले. या परिषदेत कितीतरी कल्याणकारी संस्था जलसंवर्धनासाठी कार्यरत आहेत. शिवाय कितीतरी योजना येणाऱ्या काळात राबविल्या जातील. परंतु या देशाचे नागरिक म्हणून सामाजिक जाणिवेतून वाढत्या लोकसंख्येमुळे आणि हवामान बदलामुळे निर्माण होणारे जलसंकट टाळण्यासाठी काही कर्तव्य आपल्याला सुद्धा पार पाडणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी अडवणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि भूजलाची पातळी वाढविण्याकरिता उपाययोजनांवर कार्य करणे व समाजात, वस्तीत यासंबधाने प्रचार, प्रसार करून जनजागृती करणे गरजेचे असेल.

जलसंधारण संबंधीची माहिती, पाणी बचतीचे महत्त्व शालेय स्तरापासून मुलांमध्ये रुजविणे गरजेचे आहे तसेच वैयक्तिक पातळीवर पाण्याची बचत, उपयोग आणि वापर यासंबंधी जनजागृती होणे गरजेचे आहे.

सरकारणे सुद्ध जलक्रांती परिषदेत आलेल्या सूचनांची दखल घेऊन भूपृष्ठावरील पाण्याची पातळी वाढण्याकरिता कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून योजना राबवावी. जसे महामार्गाच्या आसपास किंवा परिसरात पाणी साठविण्याकरिता किंवा पाणी मुरवण्याकरता शास्त्रीय आणि कायदेशीर पद्धतीचा अवलंब करून महामार्गाच्या दुतर्फा पाण्याचा योग्य निचरा होणारी गटारे, स्टार्म वॉटर ड्रेन्स तयार करून पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरावे याकरिता शोष खड्डे किंवा रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम तयार करणे ही आजच्या काळाची गरज आहे तसेच या परिसरातील गावांच्या मदतीने महामार्गाच्या सुरक्षित अंतरावर शेत तलाव किंवा पाझर तलाव बांधावे अर्थात असे प्रकल्प कायदेशीर परवानगीने पूर्ण करण्यात यावे. यामुळे भूपृष्ठावरील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.

पर्यावरणाचा समतोल राखण्यास जलसंधारणासोबत वृक्षारोपण जास्तीत जास्त करणे आवश्यक आहे. कारण यामुळे झाडांच्या मुळांमुळे माती धरून ठेवली जाते ज्यामुळे पाण्याचा भूपृष्ठावरील वेग मंदावतो आणि पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

### एसटी महामंडळाचा टोल-फ्री क्रमांक असावा

दररोज हजारो प्रवासी एसटी बसने प्रवास करतात, परंतु कधी कधी एसटी बसस्थानकावर केलेल्या फोनला उत्तर दिले जात नाही. वारंवार फोन करून प्रवासी थकून जातात, कारण त्यांच्या फोनला उत्तर दिले जात नाही. आमची परिवहन मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी टोल-फ्री चौकशी सेवा सुरू करावी. प्रवाशांना दिलासा देण्यासाठी प्रत्येक एसटी बस थांब्यावरील वेळापत्रकावर टोल-फ्री क्रमांक प्रदर्शित करावा. आम्हाला आशा आहे की परिवहन मंत्री याकडे लक्ष देतील आणि प्रवाशांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेतील.



**राजेश कारिया**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या विश्वास, विकास व जनकल्याण अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

आज भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालय, जालना येथे मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या विश्वास, विकास व जनकल्याण अभियानांतर्गत जालना ग्रामीण व जालना महानगर या जिल्हयाच्या वतीने जिल्हास्तरीय या कार्यशाळेत जून महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त मीडिया संवाद, विशेष जनसंपर्क अभियान, जनकल्याण शिबिरे, संवाद संमेलने, उपलब्धी प्रदर्शन तसेच नैसर्गिक शेती शाळा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

तसेच, ५ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रत्येक मंडळात एक झाड आईच्या नावाने या संकल्पनेतून ५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. यासाठी शाळा, महाविद्यालये तसेच सामाजिक व व्यावसायिक संस्थांचा सहभाग वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. २१ जून रोजीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रत्येक मंडळात योग शिबिरांचे आयोजन करून योगतज्ज्ञांना आमंत्रित करण्यात यावे असेही सांगण्यात आले. तसेच, २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त काळा दिवस कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत चर्चा करून नियोजन करण्यात आले. यावेळी सर्व समिती संयोजक व सहसंयोजकांची बैठक घेऊन



कार्यक्रमांची रूपरेषा, जबाबदाऱ्यांचे वाटप आणि अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि आवश्यक माहिती वेळेत सरल प व नमो पवर अपलोड करावे. यावेळी भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे, महापौर वंदना मगरे, स्थायी समिती सभापती अशोक अण्णा पांगारकर, रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, भिमराव जावळे, सिद्धिविनायक मुळे, अनिल कोलते, धनराज काबलिये, वसंत शिंदे सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, अमोल कारंजेकर, गोविंद ढेंबरे, अर्जुन गेही, विश्वजीत खरात, तसेच महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे यांच्यासह नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जून महिन्यातील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी समन्वय, संघटनशक्ती आणि जनसंपर्काच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## तब्बल १३ लाखांचे १९०० लिटर भेसळयुक्त तुप जप्त

### तीर्थपुरीत अन्न आणि औषध प्रशासनाची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारताच राज्यभर भेसळयुक्त खाद्यपदार्थांवर छापा कारवाई केल्या जात आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त अन्न पदार्थ जप्त करण्यात येत आहेत. जालन्यात तब्बल १३ लाख रूपये किमतीचे भेसळयुक्त तुप अन्न व औषध प्रशासन विभागाने जप्त केल्याने एकच खळबळ उडाली. घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथील मे. मुंदडा इंडस्ट्रीज या आस्थापनेवर छापा टाकून भेसळयुक्त तुप साठा जप्त केला आहे. तपासणी केली सदर ठिकाणी खाद्यतेल आणि इसेन्स चा वापर करून तुप निर्मिती केली जात असल्याचे निदर्शनास आले. यामुळे तुपाचे पाच ब्रँडचे नमुने घेण्यात आले आहेत. खुल्या साठ्यातील तुप, रिफाईंड सोयाबीन तेल आणि इसेन्स असे एकुण आठ नमुने घेण्यात आले आहेत. याठिकाणाहून पॅकबंद ११२१.८ लिटर, खुले ६६३.८ लिटर तर रिफाईंड सोयाबीन तेलाचा ११८ लिटर असा एकुण १९०३ लिटर भेसळयुक्त तुप जप्त करण्यात आले आहे. या तुपाची किंमत १३ लाख ४ हजार ५३९ रूपये एव्हढी आहे. संबंधित दुकान पुढील आदेशापर्यंत सील करण्यात आले आहे. तपासणी साठी घेतलेले नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात येणार आले असून विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर असुमाका कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. यापुढे देखील प्रशासनाकडुन नियमित तपासणी मोहिम राबविण्यात येऊन भेसळखोरांविरुध्द धाडसत्र सुरु राहणार आहे. सदर कारवाई एस. आर. करकाळे, सह आयुक्त (अन्न), छत्रपती संभाजीनगर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त, जालना नि.सु. कुलकर्णी, अन्न सुरक्षा अधिकारी अश्विनी तांबे, अन्न सुरक्षा अधिकारी अनुजा नगरारे, नमुना सहायक धम्मदीप नरवडे यांचे पथकाने केली.

## संक्षिप्त

### महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी बाळासाहेब दखणे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**


सपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये माहिती अधिकार कार्यकर्त्यांवरती होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात संघर्षात्मक लढा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ स्थापन करण्यात आला असून विविध कार्यकारी निवडण्यात आली आहे.

या निवडीमध्ये महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी च्या कार्याध्यक्षपदी आंतरवाली सराटी गावचे सुपुत्र आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब दखणे यांच्यीं सामाजिक कार्याची दखल घेऊन यांची निवड करण्यात आली आहे त्यांना निवडीचे पत्र संस्थापक अध्यक्ष विश्वास मोहिते यांनी नुकतेच दिले आहे.

या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### खाटूश्यामजी रेल्वे यात्रा व भागवत कथेचे आयोजन भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे –राधेश्याम चांडक

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**



सद्भावना सेवा समितीच्या वतीने ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत श्री खाटूश्यामजी रेल्वे यात्रा तसेच श्रीमद्भागवत कथेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. चित्रकूट येथील बालसंत श्री दीपशरणजी महाराज यांच्या अमृतवाणीने भागवत कथा संपन्न होणार असून, भाविकांनी या आध्यात्मिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले आहे.

शहरातील अनेक श्यामभक्तांच्या आग्रहास्तव समितीने विशेष रेल्वे यात्रेचे आयोजन केले आहे. मर्यादित जागा उपलब्ध असल्याने प्रथम नोंदणी करणाऱ्या भाविकांना प्राधान्य दिले जाणार असून, 'ना नफा–ना तोटा' या तत्त्वावर सात दिवसीय यात्रेची आखणी करण्यात आली आहे. भागवत कथेच्या मुख्य यजमानपदी सौ. सरला सुरेशचंद्र गट्टाणी आहेत. कथेदरम्यान विविध धार्मिक प्रसंग व उत्सव साजरे करण्यात येणार आहेत. ३१ ऑगस्ट रोजी भागवत महात्म्य, राजा परीक्षित व शुकदेव कथा, १ सप्टेंबर रोजी शिवविवाह व ध्रुवचरित्र, २ सप्टेंबरला रामजन्म व कृष्णजन्म, ३ सप्टेंबरला रुक्मिणी स्वयंवर व गोवर्धन पूजा, तर ४ सप्टेंबर रोजी सुदामा चरित्राचे निरूपण होणार आहे. खाटूश्यामजीचे धार्मिक महत्त्व विशद करताना चांडक म्हणाले की, भगवान श्रीकृष्णाचा अवतार म्हणून खाटूश्यामजींना मानले जाते. त्याग, समर्पण आणि मानवतेच्या कल्याणासाठी शिरदान देणाऱ्या बर्बरीकाच्या अद्भुत कथेवर भाविकांची श्रद्धा आहे. 'हारे का सहारा, खाटूश्याम हमारा' या भावनेने लाखो भक्त खाटूश्यामजींच्या चरणी आपली व्यथा मांडतात. यात्रेदरम्यान भाविकांसाठी चहा, नाश्ता, दोन वेळचे भोजन व निवासाची व्यवस्था समितीतर्फे करण्यात येणार आहे. मलकापूर रेल्वे स्थानकावरून ३० ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता रेल्वेने यात्रा प्रस्थान करणार आहे. रेल्वे आरक्षणासाठी दोन महिने आधी नोंदणी आवश्यक असल्याने इच्छुकांनी तातडीने नोंदणी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. यात्रेदरम्यान श्यामकुंड, जीनमाता मंदिर, काजळ शिखर रोपवे, हर्षनाथ मंदिर, पुष्कर, सावित्रीमाता मंदिर, लोहागळ तीर्थधाम, सालासर बालाजी व जयपूर आदी धार्मिक व पर्यटन स्थळांना भेटी देण्यात येणार आहेत. यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी चंपालाल शर्मा, प्रकाशचंद्र पाठक, राजेश देशलहरा, तिलोकचंद चांडक, सुरेशचंद्र गट्टाणी, सिद्धार्थ शर्मा, उमेश मुंधडा, विजय व्यवहारे, सुभाष दर्डा, मधुकर गायके, पुरणमल शर्मा, मनमोहन शर्मा व लालाभाई माधवाणी हे विशेष परिश्रम घेत आहेत. पुढील वर्षी समितीच्या वतीने बद्री–केदार यात्रेसह अशाच प्रकारच्या रेल्वे यात्रेचे आयोजन करण्याचा मानस असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. सद्भावना सेवा समितीच्या या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अधिकाधिक भक्तांनी सहभागी होऊन आध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## चक्रीवादळदळाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

### शत्रुघ्न कनसेंनी घटनास्थळी भेट देत अधिकाऱ्यांना दिले पंचनाम्याचे आदेश



**तभा वृत्तसेवा**
**परतुर । प्रतिनिधी**

काल परतुर व परतुर तालुक्यातील श्रीष्टी , येणोरा , पाटोदा या गावातील परिसरात संध्याकाळी अचानक अलेल्या चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांचे मोठे अनोतान नुकसान झाले आहे . तसेच गावातील शाळेवरील पत्रे उडुन शाळेचे मोठे नुकसान झाले आहे . या शेतकऱ्यांचे अनोतान नुकसान भरपाई करण्यासाठी लोकनेते आमदार बबणराव लोणीकर व सभापती राहुल भैया लोणीकर यांना फोनद्वारे संवाद साधत माहिती दिली आहे . त्यांनी तात्काळ मिळाली मिळताच त्यांनी विलंब न करता तात्काळ आपत्ती व्यवस्थापन चे प्रमुख उपविभागीय कृषी अधिकारी व तहसीलदार यांनी नुकसानीने बाधित भागाचे तात्काळ पंचनामे करण्यासाठी सूचना दिल्या

कृषी सहाय्यक,तलाठी,ग्रामसेवक गावकऱ्यांसह मी तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे उपस्थित राहून नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून,यंत्रणेच्या माध्यमातून पंचनामे करून घेतले. यावेळी शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतली.निश्चित स्वरूपात नेहमीप्रमाणे विधानसभे मध्ये शेतकऱ्यांचे नेते,आमदार बबनराव लोणीकर साहेब आवाज उचलतील व मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतील.या आपत्तीच्या गंभीर परिस्थितीमध्ये आम्ही शेतकऱ्यां सोबत आसल्याची ग्वाही भाजप तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांनी दिली .

## आमदार लोणीकरांचा संताप, दिरंगाईखोर अधिकाऱ्यांना बदलीचा झटका; महावितरणमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांनी खळबळ

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील वारंवारच्या वीज समस्यांवरून आमदार बबनराव लोणीकर यांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार केल्यानंतर जिल्ह्यात मोठी प्रशासकीय खळबळ उडाली आहे. जालना शहरात वारंवार वीज खंडित होणे, अनेक तास वीजपुरवठा बंद राहणे, मंजूर विकासकामे रखडणे आणि नागरिकांना सातत्याने त्रास सहन करावा लागणे या मुद्द्यांवर लोणीकर यांनी आक्रमक भूमिका घेतली. शहरातील लाखो नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असताना संबंधित यंत्रणा गंभीर नसल्याचा आरोप त्यांनी केला.

मागील महिन्यात एमआयडीसी परिसरात ३३ केव्ही वीजवाहिनी तुटल्यामुळे जालना शहरातील मोठा भाग तब्बल २४ तासांपेक्षा अधिक काळ अंधारात राहिला होता. त्यानंतर पुन्हा एकदा अशाच प्रकारामुळे शहरातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठा विस्कळीत झाला. नागरिकांना पाणीपुरवठा, व्यापार, उद्योग, शिक्षण आणि दैनंदिन कामकाजावर त्याचा मोठा परिणाम सहन करावा लागला. वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे शहरवासीयांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून या सर्व प्रकाराला महावितरणच्या नियोजनशून्य कारभाराला जबाबदार धरले जात आहे. जालना शहरातील मोतीबाग परिसरात मंजूर असलेले नवीन ३३ केव्ही उपकेंद्र अद्याप कार्यान्वित न झाल्याचा मुद्दा देखील लोणीकर यांनी जोरदारपणे उपस्थित केला. शहराच्या वाढत्या वीजभाराचा विचार करून हे काम मंजूर करण्यात आले होते. मात्र जागा, प्रशासकीय प्रक्रिया आणि इतर कारणांमुळे प्रकल्प रखडल्याचा आरोप होत आहे.



परिणामी जालना शहरातील पाच लाखांहून अधिक नागरिकांना वारंवार वीज समस्यांचा सामना करावा लागत असून भविष्यातही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय ट्रान्सफॉर्मर उभारणी, क्षमतावाढ आणि वीज वितरण सुधारणा यासाठी ४० कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर झाल्याचे सांगितले जात असले तरी अनेक कामे वेळेत पूर्ण झालेली नाहीत. इनफ्रा योजनेअंतर्गत गावठाण भागातील वीज विकासाची कामेही संथगतीने सुरू असल्याने ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. मंजुरी मिळाल्यानंतरही प्रत्यक्ष कामे वर्षानुवर्षे रखडत असल्यामुळे जनतेत संताप वाढत आहे. शेतकऱ्यांच्या वीजपुरवठ्याच्या प्रश्नावरही लोणीकर यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. अनेक ३३ केव्ही लाईनच्या क्षमतावाढीची कामे पूर्ण न झाल्यामुळे कृषी पंपांना पुरेशी वीज मिळत नसल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. शेतीच्या हंगामात नियमित वीज न मिळाल्याने उत्पादनावर परिणाम होत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. शहरासोबतच ग्रामीण भागातील वीज व्यवस्थापनातही गंभीर त्रुटी असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणानंतर महावितरणमधील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्याची चर्चा जिल्हाभर रंगली आहे. अध्यक्ष अभियंता श्री. सरल, कार्यकारी अभियंता श्री. मठपती आणि कार्यकारी अभियंता श्री. पेन्सलवार यांच्या बदल्यांचा उल्लेख करत लोणीकर समर्थकांनी ही कारवाई जनतेच्या प्रश्नांवर झालेल्या आक्रमक पाठपुराव्याचा परिणाम असल्याचा दावा केला आहे. बदल्या हा प्रशासनाचा विषय असला तरी कामातील दिरंगाई आणि निष्क्रियतेवर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर या घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जनतेच्या प्रश्नांवर तत्परतेने आवाज उठवणारे लोकप्रतिनिधी म्हणून बबनराव लोणीकर यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले. वीज संकट, रखडलेली विकासकामे, अपूर्ण उपकेंद्रे, शेतकऱ्यांचा वीजपुरवठा आणि नागरिकांच्या वाढत्या अडचणी या सर्व बाबी थेट मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत त्यांनी प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली. जालना शहर आणि जिल्ह्याला दर्जेदार, अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी आपला पाठपुरावा सुरूच राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात येत आहे.

## पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या हल्याच्या टेंभुर्णी मराठी पत्रकार संघाने केला निषेध



**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी । प्रतिनिधी**

दैनिक 'जगाचा जगमित्र'चे संपादक संतोष भुतेकर यांच्यावर गुटखा माफियांकडून झालेल्या भ्याड हल्ल्याचा टेंभुर्णी मराठी पत्रकार संघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश राठोड यांना निवेदन देऊन संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

सदरील निवेदनात म्हटले आहे की, अवैध धंदे करणारे गुटखा माफिया बातम्या छापल्या म्हणून लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांवर हल्ले करत असतील तर हे गंभीर आहे. अशा गुन्हेगारांवर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी टेंभुर्णी मराठी पत्रकार संघाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश राठोड यांना निवेदन देऊन, टेंभुर्णी पत्रकार , रावसाहेब अंभोरे, पी. जी. तांबेकर, नसीम शेख, सुनील भाले, संजय राऊत, गजानन देठे, बी. डी. सवडे, अलकेश सोमाणी, बालाजी शेवाळे, साबेर शेख, फकरू कुरेशी, गजानन शेळके, सुनील जोशी, आशपाक शेख, आशिष पैठणे शेख इंम्रान शेख गफुर शेख असद भिकन खाँ पठाण आदी पत्रकार उपस्थित होते. पत्रकारांवर होणारे हल्ले हा लोकशाहीवरचाच हल्ला असून पोलिसांनी अवैध गुटखा विक्री करणाऱ्या माफियांवर तातडीने कारवाई करावी, अन्यथा पत्रकार संघातर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

## जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे प्रौढ पोषण कार्यशाळा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष टाळण्यासाठी आणि एका निरोगी समाजाची निर्मिती करण्यासाठी, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे ३ जून २०२६ रोजी दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे अध्यक्षपद जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल (भा.प्र.से.) यांनी भूषवले. उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी निरोगी आणि संतुलित आहाराचे दैनंदिन जीवनातील महत्त्व विशद केले व उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनी संतुलित पोषक आहार बाबत आज पासून संकल्प करण्याचा निर्धार करावा असे आवाहन केले.

तसेच या कार्यक्रमास प्रामुख्याने रमेश मिसळ (अपर जिल्हाधिकारी, जालना), शशिकांत हदगल (निवासी उपजिल्हाधिकारी, जालना ), श्रीमती सुकेशिनी पगारे (जिल्हा पुनर्वसन अधिकारी), पद्माकर गायकवाड (उपविभागीय अधिकारी) या मान्यवरांसह जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये मुख्य मार्गदर्शक म्हणून



डॉ. देवजी पाटील यांनी उपस्थितांना अत्यंत सोप्या भाषेत आरोग्याची गुरुकिल्ली समजावून सांगितली. कार्यशाळेत खालील महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले: या सर्वांमधून शरीराला किती ग्रॅम प्रथिने, एकूण कार्बोहायड्रेट्स मिळतात आणि त्यात साखरेच्या चमच्यांची संख्या किती असते, याची अत्यंत अचूक आकडेवारी घरगुती मापांसह (उदा. १ वाटी, १ ग्लास, १ चमचा) देण्यात आली आहे. हा तक्ता उपस्थितांना त्यांच्या दैनंदिन आहाराचे नियोजन करण्यास अत्यंत फायदेशीर ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. समारोप सकस खा, निरोगी रहा)हा संदेश देत, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेत कामाचा ताण हलका करावा, या उद्देशाने घेतलेली ही कार्यशाळा आज संपन्न झाली.

## घनसावंगी मतदारसंघात २६१ कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी

### आ.हिकमत उढाण यांच्या पाठपुराव्यामुळे रस्त्यांचा प्रश्न मार्गी

**तभा वृत्तसेवा**
**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकासाच्या कामांना मोठी गती मिळाली असून अनेक वर्षांपासून रखडलेल्या महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. आमदार हिकमत उढाण यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या निधीसह विविध रस्ते विकास प्रकल्प मार्गी लागले असून लवकरच प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली. घनसावंगी मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने बळेगाव आपेगाव ते कुंभार पिंपळगाव या सुमारे ८५ किलोमीटर लांबीच्या महत्त्वपूर्ण रस्त्यासाठी तब्बल २६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) पूर्ण झाला असून प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. लवकरच या रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती मिळाली आहे. याशिवाय सुखापुरी – मतदारसंघातील नागरिकांना दर्जेदार रस्ते सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. मंजूर झालेल्या प्रकल्पांची कामे लवकरात लवकर पूर्ण करून विकासाचा लाभ प्रत्येक गावापर्यंत पोहोचविण्यास प्राधान्य दिले जाईल असे आ.हिकमत उढाण यांनी सांगितले.



फाटा ते अंतरवाली टेंभी या सुमारे २९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यालाही मंजुरी मिळाली आहे. या रस्त्यासाठी सर्वेक्षण आणि निविदा प्रक्रिया सुरू असून जुलै ऑगस्ट महिन्यात प्रत्यक्ष कामाला प्रारंभहोण्याची शक्यता आहे. अंतरवाली टेंभी ते मंगरुळ रस्ते कामाला मंजुरी प्राप्त असून रामसगाव ते बानेगाव–भोगाव रस्त्यलाही मंजुरी प्राप्त आहे. या मार्गामुळे परिसरातील अनेक गावांना चांगली जोडणी मिळणार आहे. तसेच अंतरवाली टेंभी ते मंगरुळ आणि रामसगाव ते बानेगाव भोगाव या –महत्त्वाच्या रस्त्यांनाही मंजुरी प्राप्त झाली असून संबंधित विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे. या कामांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना वर्षभर सुरक्षित व सुकर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागातील रस्ते हे विकासाचे प्रमुख साधन मानले जातात. चांगल्या रस्त्यांमुळे शेतमालाची वाहतूक सुलभहोईल, व्यापारी व्यवहारांना गती मिळेल, शिक्षण व आरोग्य सेवांपर्यंत पोहोचणे सोपे होईल तसेच उद्योग–व्यवसायालाही चालना मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्पांकडे मतदारसंघातील नागरिकांचे विशेष लक्ष लागले आहे. आ. उढाण यांनी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधांना प्राधान्य दिले असून रस्ते विकासाच्या माध्यमातून ग्रामीण भागाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जाते. आगामी काळात आणखी काही महत्त्वाच्या विकासकामांसाठीही प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हा सामान्य रूग्णालयात जागतिक क्लबफूट दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**
हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयात आज ४ जून रोजी 'जागतिक क्लबफूट दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जन्मजात दोन्ही किंवा एक पाय आतल्या बाजूला वळलेला असणे (क्लबफूट) या विकारावर जिल्हा रुग्णालयात संपूर्ण मोफत उपचार उपलब्ध असून, याद्वारे लहान मुलांच्या दिव्यांगत्वावर मात केली जात आहे, अशी माहिती यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.
हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयात जन्मजात पाय आ-तील बाजूस वाकलेल्या बालकांसाठी विशेष मोफत उपचार मोहीम राबवली जात आहे जागतिक दर्जाच्या पद्धतीचा वापर करून दर आठवड्याला बाळाच्या पायाला विशिष्ट प्लास्टर केले जाते, ज्यामुळे पाय हळूहळू सरळ होतात. प्लास्टरचा कोर्स पूर्ण झाल्यानंतर पाय पुन्हा वाकडे होऊ नयेत म्हणून दिले जाणारे विशेष कॅलिपर आणि बूटही रुग्णालयामार्फत मोफत दिले जा-तात. या मोहिमेमुळे हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील गरीब व गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहेपालकांनी घाबरून न जाता पहिल्याच महिन्यात बाळाला जिल्हा साम ान्य रुग्णालयात घेऊन यावे. बाळ जितके लहान, तितके त्याचे हाड लवचिक असते आणि उपचार जलद होतात. हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा आणि आपल्या पाल्याला दिव्यांगत्वापासून वाचवावे.जागतिक क्लबफूट दिनानिमित्त रुग्णालयात उपचार घेत असलेल्या लहान बालकांना खेळणी, फुगे आणि खाऊचे वाटप करून त्यांचा उत्साह वाढवण्यात आला यावेळी कार्यक्रमास डॉ. दीपक मोरे, डॉ. स्नेहल नगरे, डॉ मनीष बागडिया, डॉ लोकेश गौड, डॉ गहिलोत, प्रा जितेंद्र भट्ट, परिचारिका टापरे, सिस्टर खंडारे, बेडे कटके, परदेशी समन्वयक प्रतिक्षा इंगोले, प्रीती साठे, सूर्यकांत राजुलवार उपस्थित होते.

# पोलिस दलातील ३९ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या

## पोलिस अधीक्षक डॉ रोहन यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**
अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसण-ारे तसेच ज्यांच्याबद्दल तक्रारी आहेत अशा पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नुकत्याच पोलिस अध-ीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी बदल्यांचे आदेश काढले आहेत. त्यामुळे पोलिस दलात एकच खळबळ उडाली असून परंतु काही कर्तव्यदक्ष अधिकारी यांना मोठी जबाबदारी सोपवली आहे तर काहींना नियंत्रण कक्षात आणून बसवले असल्याचे दिसत आहेत.
पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन रूजु झाल्यापासून कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी अवैधधंद्यांवर कारवाईसह इतर अनेक उपक्रम राबवून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आ-हेत. परंतु पोलिस दलात अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी, एकाच पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची गोपनीय माहीती काढून त्यांच्यावर विशेष लक्ष केंद्रीत केले होते. अशा तब्बल ३९ अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्यांचे आदेश पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी काढल्यामुळे पोलिस दलातील अनेक वर्षापासून एकाच पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे धाबे दणाणले आहेत.
यामध्ये जिल्ह्यातील नऊ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून बदली तत्वावर नव्याने दाखल झालेल्या सहा पोलिस अधिकाऱ्यांना पदभार दिला आहे. जिल्ह्यातील ३९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या नंतर कर्मचाऱ्यांना लक्ष्य केले जाते की काय असे वाटत असतांना पोलिस अधीक्षकांनी महत्वाच्या ठाण्यातीहल नऊ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. ज्यामध्ये हिंगोली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांची जिल्हा विशेष शाखेमध्ये बदली करण्यात आली आहे. बाळापूर पोलिस ठाण्याचे सपोनि विष्णुकांत गुट्ठे यांची हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली आहे तर ग्रामीण पोलिस ठाण्याचे निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांची औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. कामाच्या बाबतीत अनेक तक्रारी प्राप्त असणारे प्रेमकुमार माकोडे यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक शरद मरे यांची आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात, तर नियंत्रण कक्षातील पोलिस निरीक्षक शेख गफार शेख खलील यांची वाहतुक शाखेत बदली करण्यात आली आहे. कुरूंदाचे सपोनि रामदास निरदोडे यांची वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात, हट्टा पोलिस ठाण्याचे सपोनि संग्राम जाधव यांची वसमत शहर पोर्सि ठाणे याशिवाय बदलीने नव्याने हजर झालेले सपोनि महादेव पुरी यांची कुरूंदा, सपोनि संदीप बोरकर यांची हट्टा ठाणे, सपोनि आयुब शेख यांची औंढा नागनाथ ठाणे, सपोनि उमाकांत पुणे यांची कळमनुरी ठाणे तर सपोनि वसंत आरसेवार यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या सायबर विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. या बदल्यामुळे पोलिस वर्तुळात खमंग चर्चा आहे.

# रविवारी वसमत येथे कवी संमेलनाचे आयोजन






**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**
वसमत येथे अक्षरोदय साहित्य मंडल आणि गाववाला शाहीर मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७ (सात) जून वार रविवारी सकाळी ठीक ११.०० वाजता कवी मदन अंभोरे यांच्या शेताच्या बांधावर घुमणार मिरगाच्या कविता
या कविसंमेलनाचे अध्यक्ष विजयभाऊ दगडू गाववाला वृत्तपत्राचे संपादक उप-स्थित राहणार आहेत तर उद्घाटक म्हणून प्रसिद्ध कवयित्री सौ.सिंधूताई दहिफळे हिंगोली या उपस्थित राहणार आहेत तर कवी विजय गुंडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत या बांधावरच्या कविसंमेलनात कवी कैलास कावरखे, डॉ.निखिल नायक, संदीप पाटील गोरेगावकर, समाधान लोणकर, राजकुमार मोरगे, विलास
भालेराव, बालाजी शेळके, बबन मोरे, बालिका बरगळ, उषा ठाकूर, कवयित्री देशमुख ताई, मदनराव अंभोरे, विजयकुम ार यंगडे, बालाजी मोरे, अक्षय बरडे, बालाजी जाधव, लक्ष्मीमनसुत टाकणार, भगवान अमलापुरे, एन. डी. राठोड, संगम स्वामी, आर. एन. कांबळे, नितिन सुर्यवंशी, सौ महानंदा केंद्रे, भास्कर गिते, सुभाष पांचाळ, उध्दव परभणीकर, बारह-ाते, लागणा, संगीर अहमद पठाण, इद्रीस कुरेशी, सोनाळे हिंगोली:- वसमत येथे अक्षरोदय साहित्य मंडल आणि गाववाला शाहीर मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७ (सात) जून वार रविवारी सकाळी ठीक ११.०० वाजता कवी मदन अंभोरे यांच्या शेताच्या बांधावर घुमणार मिरगाच्या कविता
या कविसंमेलनाचे अध्यक्ष विजय दगडू गाववाला वृत्तपत्राचे संपादक उपस्थित राहणार आहेत तर उद्घाटक म्हणून प्रसिद्ध कवयित्री सौ.सिंधूताई दहिफळे हिंगोली या उपस्थित राहणार आहेत तर कवी विजय गुंडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रा-हणार आहेत या बांधावरच्या कविसंम ेलनात कवी कैलास कावरखे, डॉ.निखिल नायक, संदीप पाटील गोरेगावकर, सम ाधान लोणकर, राजकुमार मोरगे,विलास भालेराव, बालाजी शेळके, बबन मोरे, बालिका बरगळ, उषा ठाकूर,कवयित्री देशमुख ताई, मदनराव अंभोरे, विजयकुम ार यंगडे, बालाजी मोरे, अक्षय बरडे, बालाजी जाधव, लक्ष्मीमनसुत टाकणार, भगवान अमलापुरे, एन. डी. राठोड सर, संगम स्वामी, आर. एन. कांबळे, नितिन सुर्यवंशी, सौ महानंदा केंद्रे आदींची उप-स्थिती राहणार आहे. या शेतकऱ्यांच्या बांधवरच्या मिरगाच्या कविसंमेलनात वसमत परिसरातील कवींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मदन अंभोरे यांनी केले आहे

# डीएपी खताला पर्यायी खतांचा वापर करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून–** यंदाच्या खरीप हंगामात एल-निनोच्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी पुरेसा पाऊस (किमान १०० मिमी) झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे यांनी केले आहे.
कमी पाऊस अथवा पावसातील खंड यांचा विचार करून शेतकऱ्यांनी खरेदी केलेले बियाणे व खते वाया जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच खतांच्या वापराबाबत केवळ डी.ए.पी. (१८:४६:०) खतावर अवलंबून न राहता स्फुरदयुक्त पर्यायी खतांचा वापर करावा, असेही त्यांनी सांगितले. बाजारात डी.ए.पी.ला पर्याय म्हणून विविध स्फुरदयुक्त खते उपलब्ध असून त्यांचा योग्य प्रमाणात वापर केल्यास पिकांना आवश्यक अन्नद्रव्यांचा पुरवठा होऊ शकतो. शेतकऱ्यांनी पिकांच्या गरजेनुसार व मृदा परीक्षणाच्या शिफारशीनुसार संतुलित खत व्यवस्थापन करावे. नत्र, स्फुरद, पालाश तसेच दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समावेश असलेल्या खतांचा वापर केल्यास उत्पादनवाढीस मदत होईल.डी.ए.पी.ला पर्याय म्हणून टी.एस.पी. + युरिया तसेच एस.एस.पी. + युरिया यांचा वापर करता येऊ शकतो. याशिवाय १२:३२:१६ व २०:२०:०:१३ ही एन.पी.के. युक्त खतेही पर्यायी स्वरूपात उपलब्ध आहेत.शेतकरी बांधवांनी उपलब्ध पर्यायी खतांचा वापर करून संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब करावा व खरीप हंगामाची यशस्वी तयारी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे यांनी केले आहे.

# खा. रामराव वडकुते यांची गृहनिर्माण व शहरी व्यवहार विषयक संसदीय स्थायी समितीवर नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**
राज्यसभा खासदार रामराव सखाराम वडकुते यांची संसदेतील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार विषयक विभाग-संबंधित संसदीय स्थायी समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यसभेचे सभापती यांनी विविध विभाग-संबंधित संसदीय स्थायी समित्यांवरील सदस्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या असून त्यामध्ये वडकुते यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रथमच राज्यसभेवर निवडून आलेल्या खासदाराला अल्पावधीतच अशा महत्त्वपूर्ण समितीवर काम करण्याची संधी मिळणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.
भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये विभाग-संबंधित संसदीय स्थायी समित्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. संसद अधिवेशनाच्या कालावधीबाहेरही विविध मंत्रालयांच्या कामकाजावर संसदीय देखरेख ठेवणे, योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे, अर्थसंकल्पीय तरतुदींचे परीक्षण करणे, विधेयकांचा सखोल अभ्यास करणे तसेच लोकहिताच्या विषयांवर शासनाला सूचना व शिफारशी करणे ही महत्त्वाची जबाबदारी या समित्या पार पाडतात. त्यामुळे या समित्यांवर सदस्य म्हणून नियुक्ती होणे हे कोणत्याही खासदारासाठी महत्त्वपूर्ण जबाबदारीचे आणि विश्वासाचे प्रतीक मानले जाते.
गृहनिर्माण व शहरी व्यवहार विषयक संसदीय स्थायी समिती देशातील वाढते शहरीकरण, स्मार्ट सिटी अभियान, अमृत योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शहरी पायाभूत सुविधा, सार्वजनिक वाह-तूक व्यवस्था, स्वच्छता अभियान, सांडपाणी व्यवस्थापन, कचरा प्रक्रिया, झोपडपट्टी पुनर्वसन, शाश्वत नागरी विकास आणि नागरिकांच्या जीवनमानाशी निगडित विविध विषयांचा सखोल अभ्यास करते. समितीच्या शिफारशींना केंद्र सरकारच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत विशेष म हत्त्व प्राप्त असते. त्यामुळे देशाच्या भविष्यातील नागरी विकासाची दिशा निश्चित करण्यात या समितीची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.
विशेष म्हणजे, या समितीमध्ये देशातील विविध राज्यांतील अनुभवी आणि अभ्यासू संसद सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. आसामचे माजी कॅबिनेट मंत्री आणि राज्यसभेचे सदस्य जोगेन मोहन यांच्यासारखे अनुभवी सदस्य देखील या समितीवर कार्यरत आहेत. अशा अनुभवी सदस्यांसमवेत काम करण्याची संधी मि ळाल्याने खासदार रामराव वडकुते यांना राष्ट्रीय स्तरावरील धोरणात्मक विषयांचा अधिक सखोल अभ्यास करण्याची तसेच महाराष्ट्राशी संबंधित प्रश्न प्रभावीपणे मांडण्याची संधी प्राप्त होणार आहे.
सामाजिक, शैक्षणिक, सहकार आणि विकासात्मक क्षेत्रा-तील आपल्या कार्यातून श्री. रामराव वडकुते यांनी जनसाम ान्यांशी दृढ नाते निर्माण केले आहे. ग्रामीण भागातील विकास, शेतकरी, युवक, महिला आणि वंचित घटकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी सातत्याने संवेदनशील भूमिका घेतली आहे. जनतेच्या प्रश्नांशी असलेली त्यांची बांधिलकी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळेच त्यांना राज्यसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. आता संसदीय स्थायी समितीच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या विषयांवर योगदान देण्याची संधी त्यांना प्राप्त झाली आहे. या नियुक्तीबद्दल राज्यभरातील नागरिक, कार्यकर्ते, सामाजिक संस्था, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच त्यांच्या समर्थकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सावंगी येथील शेतकऱ्याचा मुलगा झाला वर्ग-१ अधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अत्यंत स्पर्धात्मक आणि प्रतिष्ठित परी-क्षेत यश मिळवत अमोल डिगाबंर अंभोरे यांनी सहाय्यक आयुक्त तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी (वर्ग-१) या पदावर निवड होण्याचा मान मिळवला आहे. एका सामान्य शेतकरी कुटुंबातून शिक्षण घेत, शिक्षक म्हणून नोकरी, कुटुंब सांभाळत आणि अनेक अडचणींवर मात करत मिळवलेले हे यश आज हजारो स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.
त्यांच्या या यशामुळे गाव सावंगी भु ता. कळमनुरी आणि हिंग-ोली जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोव-ला गेला असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कुटुंबीय, मित्रपरिवार, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अमोल अंभोरे यांचा जन्म एका सामान्य आणि कष्टकरी कुटुंबात झाला. वडील आणि आई यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. आर्थिक मर्यादा, ग्रामीण भागातील विविध अडचणी असूनही शिक्षणा-ची आवड कायम ठेवत त्यांनी यशाचा मार्ग निवडला.
ल हा न प णा पा स ू न च अभ्यासाबरोबरच सामाजिक प्रश्नांविषयी त्यांना विशेष आस्था होती. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांसाठी काम करण्याची प्रेरणा त्यांना काका डॉ. प्रकाश अंभोरे, मुख्याध्यापक -भारतीय विद्या मंदिर, हिंग-ोली यांच्या कडून मिळाली. याच प्रेरणेतून त्यांनी भविष्यात प्रशासकीय सेवेत जाऊन लोकांसाठी काम करण्याचे स्वप्न पाहिले.
प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा सावंगी येथे पूर्ण केल्यानंतर माध्यमिक शिक्षण गुंडेवार विद्यालय, सालेगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी उच्च शिक्षण नोकरी करत पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी शिक्षक म्हणून सेवा सुरू केली. १३वर्ष विद्यार्थ्यांना ज्ञानदान करत असताना स्वतःचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी स्पर्धा परी-क्षेचा अभ्यासही सुरू ठेवला.

# जागतिक सायकल दिनानिमित्त हिंगोली शहरात भव्य सायकल रॅली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**
'सायकल चालवा, भविष्य घडवा', 'पर्यावरण वाचवा, आरोग्य जपा','झाडं लावू या, जगवू या आपली हिंगोली ग्रीन हिंगोली हेल्दी हिंगोली 'अशा गगनभेदी घोषणा देत, जागतिक सायकल दिन आणि जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हिंगोली शहरात पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या वतीने आज एका भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये शहरा-तील डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, महिला आणि युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.
रॅलीची सुरुवात शहरातील मुख्य केंद्रबिंदू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या रॅलीला उत्साहात सुरुवात झाली. ही सायकल रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. यामध्ये पोस्ट ऑफिस रोड, जवाहर रोड, गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, इंदिरा गांधी चौक, पीपल्स बँक, जिल्हा परिषद रोड,जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता आणि नगर पालिके समोरून मार्गस्थ होत एन.टी.सी. परिसराम ध्ये आली. या रॅलीचा अतिशय उत्साही वाता-वरणात समारोप करण्यात आला. संपूर्ण मार्गावर सायकलस्वारांनी दिलेल्या पर्यावरण आणि आरोग्य विषयक घोषणांनी शहर दणाणून सोडले होते.
या पर्यावरणपूरक उपक्रमात हिंगोलीतील नामांकित डॉक्टर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यामध्ये डॉ. यशवंत पवार, डॉ. राम मुंडे, सामाजिक कार्यकर्ते तथा पर्यावरण प्रेमी डॉ.अभयकुमार भरतीया, डॉ. नाकाडे, डॉ. शाह, डॉ. झडपे, डॉ. पिंगळकर, डॉ. प्रेमेन बोथरा, डॉ. गजानन शिंदे, संजय घन, गणेश पाटील, विन-ोद खरात, विजय ठाकरे, प्रजय कान्हेड, प्रवीण काळबांडे, रमेश सानप, विठ्ठल जाधव, मारोती बोबडे,किरण लाहोटी, रत्नाकर महाजन, विठ्ठल गवळी, शिवचरण ठाकूर, संतोष बाऱ्हाटे, गजानन घुगे, राजेश पांडे, विवेक वाकडे,अविनाश बोथीकर, निलेश सोनी, विश्वासराव नायक,नरेश अग्रवाल सारिका कयाल, ज्योती वाघमारे, संगीता चौधरी, मनीष पिंगळकर, मंगेश पिंगळकर, गौरव पिंगळकर, आशिष दोडल, निलेश बज, कांतराव गुंडेवार, निलेश अग्रवाल, नैणवानी, लामदाढे यांच्यासह शहरातील असंख्य नागरिक, तरुण, तरुणी आणि बालके सायकलसह सहभागी झाले होते.
आजच्या आधुनिक युगात वाहनांच्या वाढत्या वा-परामुळे प्रदूषण वाढत चालले आहे. याला पर्याय म्हणून आणि स्वतःचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी नागरिकांनी दैनंदिन जीवनात सायकलचा वापर करावा, नैसर्गिक, देशी झाडं लावावी, जगव-ावी, पाऊसपाणी संकलन कराव, सिंगल वापर प्लास्टिकचा वापर बंद करावा, कचरा जाळू नये, तो घंटा गाडीतच टाकावा. हा मोलाचा संदेश या रॅलीच्या माध्यमातून हिंगोलीकरांना देण्यात आला. पर्यावरण प्रेमींच्या या उपक्रमाचे शहरात कौतुक होत आहे.

# आंबेडकर नगरात पाणी पुरवठा सुरळीत करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**
शहरातील आंबेडकर नगरात पंधरा दिवसात एकवेळा पाणीपूरवठा केल्या जात असून केवळ १० ते पंधरा मिनीटे नळाला पाणी येत असल्यामुळे या भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून रहीवाशांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. अपुरे पाणी नळाला येत असल्यामुळे या भागातील नागरिक त्रस्त झाले असून या भागात पाणीपूरवठा सुरळीत करण्याची मागणी मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे रहीवाशांनी केली आहे. यावेळी राहुल खिल्लारे, अरविंद धाबे, सतीश बलखंडे, अनिल टीपरे, निखील दिपके, नागेश खडसे आदी उपस्थित होते.

# महायुतीचा धर्म पाळण्यासाठी खा. अशोक चव्हाण व आ. प्रताप पाटील एकत्र

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ जुन -**



छायाचित्र नरेंद्र गडप्पा

विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा विजय झाला पाहिजे ही महायुतीतील पक्षांची भूमिका असून महायुतीच्या निर्णयावरून अमर राजूरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महायुतीच्या या निर्णयाचा आदर करत आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी देखील विधान परिषदेसाठी भरण्यात आलेला प्रवीण पाटील चिखलीकर यांचा अर्ज आज मागे घेत असल्याचे खासदार अशोक चव्हाण यांनी सांगितले.

आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेस आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार ओम प्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार सुभाष साबणे, माजी आमदार अमर राजुरकर, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, व्यंकट पाटील गोजेगावकर, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे यांची उपस्थिती होती.

विधान परिषदेची निवडणूक महायुती लढवणार असून दिनांक ३१ मे रोजी महायुतीची भूमिका स्पष्ट झाली आहे. भाजपा ११, शिवसेना शिंदे ४ आणि राष्ट्रवादी २ जागा लढणार आहे. ही भूमिका स्पष्ट झाल्यानंतरच अमर राजूरकर यांचा नामांकन अर्ज दाखल करण्यात आला. दरम्यान उमेदवारी मिळावी ही अनेकांची भूमिका असते या भूमिकेतूनच प्रवीण पाटील चिखलीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतु महायुतीचा निर्णय झाल्यानंतर आज ते उमेदवारी अर्ज मागे घेणार असल्याचे खासदार अशोक चव्हाण म्हणाले.

यावेळी बोलताना आमदार प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की नांदेडची जागा राष्ट्रवादीला द्यावी अशी विनंती पक्षश्रेष्टीकडे करण्यात आली होती. दरम्यान याच अनुषंगाने प्रवीण पाटील चिखलीकर यांचा अर्ज दाखल करण्यात आला होता. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची संयुक्त बैठक घेऊन विधानपरिषद निवडणूक महायुती लढणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर महायुतीचा धर्म पाळत प्रवीण पाटील चिखलीकर यांचा अर्ज मागे घेण्यात येत असून अमर राजूरकर यांच्यासोबत राष्ट्रवादीचे ८४ सदस्य राहणार असल्याचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी स्पष्ट केले.

# हदगांवचे उपअभियंता दिलीप बोबडे अखेर कार्यमुक्त!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ जुन -**


मागील तीन साडे तीन वर्षांपासून सार्वजनिक बांधकामं उप विभाग हदगांव येथे कार्यरत सहाय्यक अभियंता श्रेणी -१ दिलीप हनुमंतराव बोबडे यांना अखेर आज बदलीच्या ठिकाणी मुख्य अभियंता नांदेड यांनी कार्यमुक्त केले आहें

श्री दिलीप बोबडे हे हदगांव येण्यापूर्वी त्यांनी किनवट येथे आदिवासी विकास उपविभाग येथे ३ वर्ष काम केले होते तत्कालीन सरकारच्या काळात त्यांनी आपली बदली हदगांव येथे करून घेतली होती त्यांचा कार्यकाळ फारसा समाधान कारक नसला तरी त्यांचे कार्यालयीन अंतर्गत त्यांचे कनिष्ठ अधिकारी यांच्याशी फार जमले नाही त्यामुळे अंतर्गत कुरघोड्या चव्हाट्या वर येत होत्या अनेक कामात अनियमितता तक्रार याचे प्रमाण वाढले होते मात्र त्या काळात बोबडे यांना संभालून घेणारे वरिष्ठ अधिकारी त्यांचे सहकारी असल्याने फारसे त्यांची प्रकरणे बाहेर आली नव्हती मात्र हदगांव चे आमदार बाबुराव कदम यांनी त्यांच्या विरोधात अर्थ संकल्पिय अधिवेशनात ब्रम्हवाडी ता हदगांव येथील कामाच्या बाबतीत अंदाज पत्रक चुकिचे बनवून शासनाला करोडो रुपयाचा चुना उप अभियंता बोबडे कनिष्ठ अभियंता राठोड यांनी कश्या पद्धतीने लावला याचे विवेचन केले होते पुढे या तक्रारी चे काय झालें ती तक्रार कोणाच्या माध्यमातून बासणात गुंडाळली गेली ह्याची चर्चा चविष्ठ पणे मोठ्या प्रमाणात होत आहे त्या सह पुनर्वसन च्या कामात मोठ्या प्रमाणात गावागावातून तक्रारी आल्या त्या पन गायब झाल्या होत्या एवढेच नाही तर हदगांव जवळील भानेगाव ह्या गावातील पुनर्वसन गावातील कामे जुन्या गावात करून बोबडे व त्यांच्या सहकार्याकडून शासनाच्या निधीचा गैरवापर केल्याची तक्रार झाली होती

दरम्यान वादग्रस्त परंतु कार्यकाळ पूर्ण झाल्याने मागच्या महिन्याच्या अखेरीस बोबडे यांची शासनाने हदगांव येथील जिल्हा परिषद बांधकामं उपविभाग येथील रिक्त पदावर बदली केली होती मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समुद्रात विहार करण्याची सवय झाल्याने त्या मानाने दुय्यम जिल्हा परिषद सारख्या ओढ्या नाल्यात (फक्त कामाच्या दृष्टीने ) काम नको म्हणून त्यांनी काही कंत्राटदार मार्फत एका लोकप्रतिनिधी मार्फत बदली ला स्थगिती साठी प्रयत्न सुरु केले होते मात्र त्यांना संपशेल अपयश आले असून काल अखेर बदली आदेशाचे पालन करून दिलीप बोबडे यांना मुख्य अभियंता नांदेड रूपा राऊळ गिरासे यांनी कार्यमुक्त करून तसा अहवाल शासनाला दिल्याने बोबडे यांचा स्वप्न भंग झाला असून त्यांना आपला गाशा गुंडालावा लागणार आहें

## 'शब्द शब्द तुझाच आहे' कवितासंग्रहाचा ७ जूनला प्रकाशन सोहळा

**नांदेड** -येथील वस्तू व सेवा कर विभागाचे राज्यकर उपायुक्त निलेश शेवाळकर लिखित 'शब्द शब्द तुझाच आहे' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता स्व. पूर्णामलजी लाहोटी सभागृह, सायन्स कॉलेज, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मराठी कवी, साहित्यिक व व्याख्याते इंद्रजीत भालेराव हे राहणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील रहिवाशी सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक, छत्रपती संभाजीनगर येथील वस्तू व कर विभागाचे अपर राज्यकर आयुक्त अभिजित राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, तसेच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची उपस्थिती लाभणार आहे.




यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख रामकृष्ण सोलंके, तसेच ग्रंथाली प्रकाशनचे विश्वस्त सुदेश हिंगलापूरकर उपस्थित राहणार आहेत. प्रेम, विरह, आईची माया, नात्यांची कोमलता आणि आयुष्यातील भावविश्व अत्यंत साध्या पण हृदयस्पर्शी शब्दांत मांडण्याचा प्रयत्न या कवितासंग्रहातून करण्यात आला आहे. तरुणाईच्या भावना आणि सामान्य माणसाच्या मनातील न बोललेले भाव या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त होत असल्याने साहित्यप्रेमींमध्ये या संग्रहाबद्दल विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्रंथाली प्रकाशन, मुंबई निर्मित या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास सर्व साहित्यप्रेमी व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथाली प्रकाशन व निलेश वसंतराव शेवाळकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यांची सुरुवात सिडको पासून : खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड**- जिल्ह्यातील काँग्रेस संघटन मजबूत करण्याच्या अनुषंगाने व एसआयआर मोहीम यशस्वीपणे राबवून घेण्यासाठी लवकरच जिल्ह्यात अनेक ठिकाणी काँग्रेस मेळावे आयोजित करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून या कार्यक्रमाअंतर्गत पहिला मेळावा सिडको येथे होणार आहे, त्यामुळे सिडकोत काँग्रेस संघटन अधिक व्यापक करावे असे आवाहन दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले. आगामी संघटनात्मक मेळाव्याच्या अनुषंगाने बुधवार (ता.३) रोजी सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीची संघटन बैठक खा. रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली यावेळी ते बोलत होते. यावेळी उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफार यांनी देखील मार्गदर्शन केले. सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी संघटनात्मक कार्य आढावा देत बैठकीचे प्रस्तावित केले. यादरम्यान नवनिर्वाचित तिनही अध्यक्षांचा सिडको काँग्रेसच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रल्हाद गव्हाणे, डॉ. अशोक कलंत्री, ज्योती कदम, गोपीनाथ कहाळेकर, माणिक श्रोते, किशन रावणगावकर, लतिफ शेख, नरोद्दीन शेख, एसपी कुंभारे, प्रा. गणेश लिंगमपल्ले, भगवान जोगदंड, अजय गालेवाड, सोपान भुरे, अझर शेख, सचिन कानोडे, नईम शेख, चव्हाण काकू, प्रभू उरुद्वाड आदीसह इतर प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन गौतम पवार यांनी केले.

नाभिक समाजाचे नेते प्रा. गणेश लिंगमपल्ले, विद्यार्थी युवा नेतृत्व सचिन कानोडे, सामाजिक कार्यकर्ते नईम शेख आदी सिडकोतील पदाधिकाऱ्यांनी यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफार, सिडको ब्लाँक अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

## तालुक्याच्या विविध समस्यांसाठी मंत्रालयात भेट

**नांदेड** -हदगाव तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी, नागरिक, सिंचनाच्या विविध प्रलंबित प्रश्न आणि विकासात्मक मागण्यांसंदर्भात मुंबई येथे मंत्रालयात महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांची भारतीय जनता पार्टीचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी भेट घेतली, या मान्यवरांच्या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान त्यांनी हदगाव तालुक्यातील जनतेच्या आणि भागाच्या विकासाशी संबंधित विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन मंत्री महोदयांना सुपूर्द केले. हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शेतकरी बांधवांचे प्रश्न, महसूल, ग्राम विकास कृषी जलसंपदा विभागाशी संबंधित प्रलंबित कामे आणि स्थानिक विकासाला गती देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध विषयांवर भेटीदरम्यान चर्चा केली. तालुक्यातील जनहिताचे प्रश्न तातडीने मार्गी लागावेत, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. या प्रसंगी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांनी हदगाव तालुक्यातील सर्व मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित विभागाच्या वतीने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे ठोस आश्वासन यावेळी दिले असल्याची माहिती भागवत देवसरकर यांनी दिली. या भेटीमुळे हदगाव तालुक्यातील अनेक प्रलंबित विकासकामांना आणि प्रश्नांना आता वेग मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. यावेळी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे परमेश्वर काळे, कैलास चव्हाण, दीपक पटणे आदी उपस्थित होते.

# गारांची बरसात अन् विजांचा कडकडाट; इस्लापूरमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा जल्लोष

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ४ जुन -**



इस्लापूर परिसरात गुरुवार दुपारी अचानक हवामानात मोठा बदल होत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि पावसाने दमदार हजेरी लावली. काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे आणि असह्य उकाड्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांना या पावसाने मोठा दिलासा दिला. विशेष म्हणजे, पावसासोबत झालेल्या गारांच्या वर्षावामुळे वातावरणात वेगळेच चैतन्य निर्माण झाले आणि हा अनपेक्षित बदल नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरला.

दुपारच्या सुमारास अचानक आकाशात काळेकुट्ट ढग दाटून आले. काही वेळातच विजांचा गडगडाट सुरू झाला आणि वादळी वाऱ्याने जोर धरला. विजांच्या लखलखाटामुळे आकाश उजळून निघत असतानाच पावसाच्या सरी कोसळू लागल्या. पावसासोबत पडलेल्या गारांनी अनेकांचे लक्ष वेधून घेतले. काही भागात अंगण, रस्ते आणि मोकळ्या जागांवर गारा साचल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अचानक बदललेल्या वातावरणामुळे बाजारपेठेत, चौकांमध्ये आणि मुख्य रस्त्यांवर काही काळ धावपळीचे वातावरण निर्माण झाले. व्यापाऱ्यांनी आपले साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी लगबग केली, तर पादचारी आणि दुचाकीस्वारांनी पावसापासून बचावासाठी आसरा शोधला. काही ठिकाणी वाऱ्याच्या वेगामुळे झाडांच्या फांद्या तुटून पडल्याच्या घटना घडल्या. तसेच काही भागात वीजपुरवठा काही काळासाठी खंडित झाल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, पावसाच्या सरी आणि थंडगार वाऱ्यामुळे वातावरणात सुखद गारवा निर्माण झाला. मागील काही दिवसांपासून तापमानाचा पारा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. अशा परिस्थितीत अचानक झालेल्या पावसाने आणि गारांच्या वर्षावाने परिसरातील वातावरण प्रसन्न झाले. अनेक नागरिकांनी घराबाहेर येत पावसाचा आनंद लुटला, तर लहान मुलांनी पडलेल्या गारा गोळा करत या अनोख्या अनुभवाचा आनंद घेतला.सोशल मीडियावरही गारांच्या वर्षावाचे आणि विजांच्या कडकडाटाचे फोटो व व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. अनेकांनी उन्हाळ्यातील गारांचा अनुभव म्हणून या क्षणांची नोंद केली. परिसरातील अनेक भागांत पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचल्याचेही चित्र दिसून आले.

एकंदरीत, गारांची बरसात, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याची साथ लाभलेल्या या पावसाने इस्लापूरकरांना उकाड्यातून दिलासा देत वातावरणात नवसंजीवनी निर्माण केली. अचानक आलेल्या या बदलामुळे गुरुवार दुपार इस्लापूरकरांसाठी संस्मरणीय ठरली.

## प्रभन्ना पाटील यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ४ जुन -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील जेष्ठ नागरिक प्रभन्ना होटलप्पा पाटील(९१)यांचे शनिवार दि.३० मे रोजी रात्री ८:४० वाजता अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.३१ रोजी दुपारी १२ वाजता शेतमळ्यात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, चार सूना,दोन मुली,दोन जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक माणिकराव पाटील, किसनराव पाटील, ग्रामपंचायत संगणक परिचालक राजेश पाटील,शेतकरी माधव पाटील यांचे वडील तर सेवा सहकारी सोसायटी चेअरमन चंद्रकांत हणमंत पाटील यांचे काका होत.

# खा. अशोक चव्हाण यांची घोषणा फिक्स तर फिक्स ; तालुक्यात चर्चा चांगलीच रंगली

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ४ जुन -**




माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांचे अत्यंत जवळचे निष्ठावंत भाजपा कार्यकर्ते मारोती पाटील शंखतीर्थकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा व धोंडे जेवण कार्यक्रम दि. २ जून रोजी शंखतीर्थ येथे उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे खा. अशोक चव्हाण यांनी केलेली एक मोठी आणि महत्त्वपूर्ण घोषणा!

मारोती पाटील यांच्या दीर्घकालीन जनसेवेची आणि निष्ठेची पावती देत, मारोती पाटील शंखतीर्थकर यांचे जिल्हा परिषद फिक्स तर फिक्स... अशी जाहीर घोषणा खासदार चव्हाण यांनी करताच उपस्थितांमध्ये एकच जल्लोष झाला आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. या घोषणेमुळे मुदखेड तालुक्याच्या आगामी राजकीय समीकरणांना मोठी गती मिळाली आहे.

**दिग्गजांची मांदियाळी आणि जनसागर**

या कौटुंबिक आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या ठरलेल्या सोहळ्याला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांनी हजेरी लावली होती.

यामध्ये प्रामुख्याने खासदार अशोकराव चव्हाण माधव पाटील कदम (नगराध्यक्ष प्रतिनिधी, मुदखेड) रामसिंग चव्हाण (नगरसेवक) ईश्वर पिन्नलवार पत्रकार, सचिन पा.मगरे भाजपा तालुका महामंत्री, यांच्यासह शंखतीर्थ आणि परिसरातील ज्येष्ठ नागरिक, विविध क्षेत्रांतील सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार अशोकराव चव्हाण यांनी मारोती पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, पक्षाशी आणि नेतृत्वाशी प्रामाणिक राहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी आम्ही सदैव खंबीरपणे उभे राहतो. मारोती पाटील यांनी सरपंच पदाच्या कार्यकाळात आणि त्यानंतरही सर्वसामान्य जनतेची कामे हिररीने केली आहेत. त्यांच्या याच लोकसंपर्काचा सन्मान आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या माध्यमातून केला जाईल, असे संकेत त्यांनी दिले.

या सोहळ्यानिमित्त आयोजित धोंडे जेवणाच्या महाप्रसादाचा हजारो नागरिकांनी लाभ घेतला. आलेल्या सर्व पाहुण्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मारोती पाटील व शंखतीर्थकर परिवाराच्या वतीने आभार मानण्यात आले. या घोषणेमुळे संपूर्ण तालुक्यात सध्या मारोती पाटील यांच्या उमेदवारीची आणि खा. चव्हाणांच्या शब्दाचीच जोरदार चर्चा सुरू आहे.

## रखडलेल्या रस्त्यामुळे नागरिक त्रस्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ जुन -**

नायगाव ते बेंद्री या मुख्य रस्त्यावरील बेंद्री ते गोळेगावला जोडणारा अंदाजे एक किलोमीटरचा रस्ता मागील वर्षभरापासून रखडलेला आहे. रस्त्याच्या कामासाठी टाकण्यात आलेली बारीक गिट्टी अद्याप तशीच असल्याने त्या गिट्टीवरुन विशेषतः दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याचे प्रकार वारंवार घडत असून अनेक जण जखमी झाले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. भविष्यात एखादी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत सोडल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. बारीक गिट्टीमुळे वाहनांचे नियंत्रण सुटत असल्याने अपघातांची संख्या वाढली आहे. शालेय विद्यार्थी, शेतकरी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस तोंडावर असल्याने या भागातील मांजरम, मांजरमवाडी, मोकासदरा, धानोरा येथील शेतकऱ्यांना खरीपाच्या पेरणीकरीता लागणारे बी- बियाणे व खत खरेदीसाठी नायगाव बाजारपेठेत यावे लागते. परंतु रस्त्याची अवस्था दयनिय झाल्याने याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत असून या एक कि.मी. च्या रस्त्याला कंटाळून नागरिक गडगा मार्गे नर्सी हून नायगावला जात आहेत. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना आर्थिक झळीसोबतच वेळही वाया घालवावा लागत आहे.

काही दिवसांत शाळा, महाविद्यालय सुरु होणार असल्याने या भागातील विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयाला जाताना मोठी कसरत करावी लागणार हे मात्र निश्चित. रस्त्याच्या बिकट अवस्थेकडे या भागाच्या लोकप्रतिनिधींसह संबंधित विभागाने वेळीच लक्ष देऊन हा मार्ग लवकरात लवकर दुरुस्त करुन शालेय विद्यार्थ्यांसह या भागातील शेतकरी व नागरिकांची होणारी अडचण दूर करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# किनवट शहरातील विजेचा खेळखंडोबा थांबविण्यासाठी ठोस उपाययोजना करा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ जुन -**

किनवट शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, या मागणीसाठी किनवट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद एंड्रलवार यांनी महावितरण कंपनीच्या उपविभागीय अभियंत्यांना निवेदन सादर केले असुन शहरातील विस्कळीत वीज व्यवस्थेवर तीव्र संताप व्यक्त करत, महावितरणच्या कारभारावर आणि शासकीय योजनांमधील कथित गैरव्यवहारावर बोट ठेऊन चौकशी करण्याची मागणी निवेदनात केली आहे.

किनवट शहर हे मागास, दुर्गम व जंगलव्याप्त भाग म्हणून ओळखले जाते. येथे पावसाचे प्रमाण सर्वाधिक आहे. मात्र, गेल्या ४० वर्षांपासून शहरात नवीन वीज खांब, नवीन तारा किंवा आधुनिक दर्जाचे रोहित्रे,ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आलेले नाहीत. दरवर्षी केवळ जुन्याच उपकरणांची डागडुजी केली जाते. त्यामुळे थोडाही वारा-पाऊस आला तरी वीजपुरवठा तासनतास खंडित होतो. कित्येकदा कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे रोहित्रांवर अतिरिक्त भार पडून नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे.

मेंटेनन्सच्या नावाखाली फक्त 'कागदोपत्री' खेळ सुरु असल्याचा आरोप त्यांनी केला असून

महावितरणकडून दर गुरुवारी दुरुस्ती व देखभालीच्या नावाखाली 'मेंटेनन्स डे' पाळला जातो आणि वीज बंद ठेवली जाते.दर आठवड्याला मेंटेनन्स होतो, तर सातत्याने वीज खंडित का होते?असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.केंद्र व राज्य शासनाकडून वीज सुधारणेसाठी विविध योजनांमधून निधी दिला जातो. मात्र, विद्युत कार्यालयातील अधिकारी आणि कंत्राटदार यांच्या संगनमताने योजनांची कामे प्रत्यक्षात न करता केवळ कागदोपत्री दाखवून आर्थिक गैरव्यवहार केला जात असल्याचा गंभीर आरोप नगराध्यक्षांनी केला आहे.

सध्या पावसाळा तोंडावर आला असून, शहरातील जागोजागी लोंबकळणाऱ्या जुन्या वीज तारा आणि नादुरुस्त रोहित्रांमुळे पावसाळ्याचे चार महिने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. त्यामुळे शहरातील जुने विद्युत खांब, जुन्या तारा आणि जुने रोहित्रे तातडीने बदलून नवीन बसवावेत, विद्युत तारांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या तात्काळ दूर कराव्यात, दुरुस्ती व साहित्य पुरवठ्याच्या नावाखाली होत असलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर दाखलपात्र कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशा मागण्या नगराध्यक्षा सौ सुजाता एंड्रलवार यांनी केल्या आहेत. याप्रसंगी रोहन एंड्रलवार,शहरप्रमुख तथा नगरसेवक प्रशांत कोरडे, नगरसेवक प्रवीण राठोड नगरसेवक शेखर नेमान्नीवार,नगरसेवक श्रीराम नेम्माणीवार,प्रभू कोल्हे,निसार भाटी,राजू सातुरवार, शेख मुकद्दर,माजी शहरप्रमुख संतोष येलचलवार,नागेश मंत्रिवार,किशोर बोलेनवार हे उपस्थित होते. निवेदनाच्या प्रती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस, नांदेडचे पालकमंत्री मा.ना. अतुलजी सावे, ऊर्जा राज्यमंत्री मा.ना. मेघना दिपक साकोरे बोर्डीकर, ऊर्जा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, आणि महावितरणच्या वरिष्ठ अभियंत्यांकडे पुढील कारवाईसाठी रवाना केल्या आहेत. आता महावितरण प्रशासन यावर काय पावले उचलते, याकडे संपूर्ण किनवटवासीयांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आद्यकवी मुकुंदराज स्वामी सभागृहात गुणवंत विद्यार्थी सत्कार संपन्न,



**अंबाजोगाई :** वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित 'गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ - २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. केज विधानसभा मतदारसंघातील दहावी, बारावी परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यास केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमीताताई अक्षय मुंदडा यांनी उपस्थित राहत विद्यार्थ्यांचे कौतुक केले व सत्कार केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा प्रदान केल्या. आगामी काळातही विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशाची नवी शिखरे सर करत समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देतील, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी युवानेते अक्षय भैय्या मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर,वसुंधरा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथ गडावर मोठी गर्दी!

# दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा- पंकजाताई मुंडे

### 'एक पेड बाप के नाम' उपक्रम प्रत्येकाने राबवावा ; नवरात्रात नवा संकल्प जाहीर करणार



**परळी वैजनाथ, दि. ०३ :** लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त आज गोपीनाथ गडावर दर्शनासाठी सकाळपासूनच गर्दी झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत आवाहनाला प्रतिसाद म्हणून भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित नसतानाही लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरणपूरक लोकसहभागाला साद घालणारे भाषण करत वृक्षारोपण,जैविक व नैसर्गिक शेती ,स्वाभिमान, समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, आणि शेतकरी हितासाठी रचनात्मक काम असे संकल्प जाहीर केले. सर्वांनी हे संकल्प पूर्ण करावे आणि पर्यावरणीय सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी योगदान द्यावे असे सांगत दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा असे आवाहन केले.

लोकनेते मुंडे साहेब यांच्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम आज गोपीनाथगडावर अत्यंत साधेपणाने झाला. यावेळी ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, त्यांच्या मातोश्री प्रज्ञाताई, जावई गौरव खाडे , नातू आर्यमन पालवे,अगस्त्य खाडे, बंधू अजय मुंडे, रामेश्वर मुंडे यांसह मुंडे कुटुंबियांनी समाधीचे दर्शन घेतले.त्याबरोबर मुंडे साहेबांना आवडणाऱ्या पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी आयोजित भजनाच्या कार्यक्रमात ना पंकजाताई मुंडे यांनी कुटुंबासह सहभाग घेतला. कार्यक्रमास महंत राधाताई सानप, आ.नमिता मुंदडा, माजी मंत्री बदामराव पंडित, बाळदादा पवार, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हाईस चेअरमन रमेश कराड, भाजप नेते गणेश हाके, प्रवीण घुगे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, बाजीराव धर्माधिकारी, माधवराव निर्मळ,योगेश क्षीरसागर , प्रा.लक्ष्मण हाके, गायताई कराड,, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी न. प. गटनेते वैजनाथ सोळंके,, भाजप गटनेते प्रा.पवन मुंडे, भाजपा प्रदेश प्रवक्ता राम कुलकर्णी, आदींसह बीड जिल्ह्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी भाजप पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, एक तप उलटले तरी साहेबांच्या आठवणी विसरता येत नाहीत.

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली जनगणना प्रगणकाला स्वतःची माहिती

### सक्रिय सहभागातून करून दिली कर्तव्याची माहिती

**बीड, दि.3 (जिमाका) :-** बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बुधवार दि. 3 जून 2026 रोजी आपल्या शासकीय निवासस्थानी आलेल्या जनगणना प्रगणकाला स्वतःची व कुटुंबाची संपूर्ण माहिती देऊन नोंदणी पूर्ण केली. या औपचारिक नोंदणीसह बीड जिल्ह्यात जनगणनेच्या राष्ट्रीय मोहिमेला गती मिळाली आहे.

याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी देशाच्या आणि राज्याच्या सर्वांगीण विकासात जनगणनेचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. शासकीय योजनांचे अचूक नियोजन, आखणी आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जनगणना हा अत्यंत महत्त्वाचा आणि मुख्य आधार आहे. जनगणना ही देशाच्या विकासाचा पाया मानली जाते. लोकसंख्या, शिक्षण, रोजगार, निवास, आरोग्य यासारखी महत्त्वाची माहिती जनगणनेतून मिळते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाची नोंद होणे हे देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

पुढे बोलताना त्यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. आपल्या घरी येणाऱ्या जनगणना प्रगणकाला कोणतीही भीती किंवा संकोच न बाळगता अचूक, खरी आणि योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे, असेही ते म्हणाले. नागरिकांनी दिलेल्या या सकारात्मक सहकार्यामुळेच ही राष्ट्रीय मोहीम पूर्णपणे यशस्वी होईल, असा दृढ विश्वासही विवेक जॉन्सन यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी जनगणनेशी संबंधित प्रगणक, अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

## आद्यकवी मुकुंदराज स्वामी सभागृहात गुणवंत विद्यार्थी सत्कार संपन्न

**अंबाजोगाई :** वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित 'गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ - २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. केज विधानसभा मतदारसंघातील दहावी, बारावी परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यास केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमीताताई अक्षय मुंदडा यांनी उपस्थित राहत विद्यार्थ्यांचे कौतुक केले व सत्कार केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा प्रदान केल्या. आगामी काळातही विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशाची नवी शिखरे सर करत समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देतील, असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी युवानेते अक्षय भैय्या मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर,वसुंधरा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोककल्याणकारी व राज्यकारभाराच्या आदर्श प्रतीक असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होत्या : विनायक रत्नपारखी



**माजलगाव :** येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजपा संपर्क कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ व्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजलगाव शहर मंडळाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी म्हणाले

की पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशातील अनेक मंदिराचा जिर्णोद्धार केला व अनेक ठिकाणी घाट बांधले , आपल्या माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे देखील त्यांनी घाट बांधला त्यामुळे धर्मकार्य, आपल्या संस्कृतीचे संरक्षण, राजसत्ता आणि शौर्य गाजवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या प्रत्येकासाठी प्रेरणास्थान आहेत व त्यामुळे लोककल्याणकारी व राज्यकारभाराच्या आदर्श प्रतीक असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होत्या , तसेच याप्रसंगी कट्टी आडगाव मंडळाच्या तालुकाध्यक्ष रूपाली कचरे म्हणाल्या , कर्तृत्व सेवा आणि संस्कार यांचा प्रेरणादायी वारसा म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होत्या तर पात्रुड मंडळाचे तालुकाध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके म्हणाले की अहिल्यादेवी यांचे विचार , संस्कार घेऊन व राजकीय वाटचालीतही त्यांचाच आदर्श घेऊन आपण पुढे गेले पाहिजे. या कार्यक्रमास उपस्थित नानासाहेब घोडके रामेश्वर चव्हाण शरद कचरे किशोर सावंत प्रल्हाद दळवी रवी गायकवाड भरत जोशी मनोज कोरडे यश कासट यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंबईहून खास उपस्थित राहिलेले सोमेश दहिवाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन रवी वाकळे यांनी केले.

## बीड येथील उपविभागीय कृषी कार्यालयात तंत्र अधिकारी भीमराव बांगर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न



**बीड (प्रतिनिधी ) :** उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय बीड येथील तंत्र अधिकारी श्री. भीमराव बाजीराव बांगर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा १ जून २०२६ रोजी अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

श्री. बांगर यांनी कृषी विभागात तब्बल ३२ वर्षे, १० महिने आणि २३ दिवस अविरत व निष्कलंक सेवा बजावली. सध्या ते उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय बीड येथे तंत्र अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेचा सन्मान करण्यासाठी कार्यालयाच्या वतीने या विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सेवापूर्ती सोहळ्याप्रसंगी उपविभागीय कृषी कार्यालयाचे उपविभागीय कृषी अधिकारी गर्जे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते श्री. बांगर यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांनी श्री. बांगर यांच्या कामाचे कौतुक केले आणि त्यांच्या पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला उपविभागीय कार्यालयातील कर्मचारी वर्ग, कृषी विभागातील विविध अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी श्री. बांगर यांच्याबद्दलच्या आठवणींना उजाळा देत त्यांना पुढील सेवानिवृत्त जीवनासाठी आरोग्यदायी व सुखमय शुभेच्छा दिल्या.

## श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

केज / प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये थोर समाज सुधारक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाचे उच्च दर्जाचे शिक्षण देणारी श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये थोर समाज सुधारक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम आहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी अभिवादन करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जिवनकार्यावर गौरोद्गार काढले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या जेष्ठ शिक्षीका रेश्मा गायकवाड या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील शिक्षिका प्रियंका शिंदे, वैष्णवी काळे, सायली गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन मध्ये विद्यार्थी पालक मेळावा व गुणवंताचा गुणगौरव सोहळा सपन्न

केज / प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नामांकित ग्रामीण भागात उच्च दर्जाचे संगणक प्रशिक्षण देणाऱ्या श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन या प्रशिक्षण केंद्रात एम एस सी आय टी (MS-CIT) चे प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी व पालकांचा मेळावा व 10 वी शालांत प्रमाणपत्र परिक्षेतील परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोली माळी सारख्या ग्रामीण भागात एमकेसीएल चे अधिकृत अध्ययन केंद्र श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशनच्या माध्यमातून व एमकेसीलचे जिल्हा समन्वयक मा. विठ्ठल पांचाळ सर यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या संगणकीय कोर्सेस च्या माध्यमातून संगणकीय साक्षरता मोठ्या प्रमाणात राबविण्याचे काम संचालक अनिल गलांडे हे करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सध्या एम एस सी आय टी (MS-CIT) करित असलेल्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्य व्यवसायात तसेच छोट्या मोठ्या नोकरीस उपयुक्त क्लीक (Klic) Know-ledge lit Carrier कोर्सेस ची जनजागृती होऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ व्हावा म्हणून पालक मेळावा घेवून याविषयीं मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून सौ. रेश्मा गायकवाड या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. कोमल कापरे, सौ. प्रियंका शिंदे, सौ. वैष्णवी काळे, कु. सायली गायकवाड, श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप चे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते.

यावेळी बोलताना सर्व अध्यक्ष व सर्व प्रमुख पाहुणे यांनी संगणकीय शिक्षणाचे महत्व विषद केले व 10 वी शालांत प्रमाणपत्र परिक्षेतील संविधान शाहू तुपारे, रोहित महादेव गायकवाड, साक्षी संजय मेहरकर, स्वाती गोकुळ सारुक, फातेमा खाजा शेख, साक्षी दशरथ गव्हाणे या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुषपगुच्छ व सन्मानचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला तर किशोर विक्रम हांगे ,राधाराणी मधुकर निंगुळे, तुळशीदास अशोक काळे, वैष्णवी राजाभाऊ माने, अभिषेक बालाजी राऊत, आदित्य बालाजी राऊत, तनुजा जगन्नाथ वणवे, श्रेया संजय शिंदे, सोनम कादिर पठाण, नाजिया जिलानी तांबोळी, आरशिया मुस्तफा तांबोळी, विराट सूर्यकांत घोडके, आदर्श उत्तरेश्वर तुपारे, मानसी दिपक बजगुडे,पूजा बालासाहेब मावकर, अभिषेक दीपक भांगे, शिवम भास्कर बर्डे, विश्वदीप वैजनाथ शिंदे, रेहान ऐंनोद्दीन शेख, वैष्णवी अश्रुबा बजगुडे, अर्पिता अश्रुबा बजगुडे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुषपगुच्छ व पदक देऊन सन्मान करण्यात आला. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप चे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतीसाठी प्रशिक्षक अदित्य गलांडे, अमोल गलांडे, संचित गलांडे यांनी परिश्रम घेतले.

या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी होणार

**माजलगाव, प्रतिनिधी :** सामाजिक परिवर्तन, मानवमुक्ती, शिक्षण प्रसार आणि समाजप्रबोधनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या भारतीय बौद्ध महासभा, माजलगाव आणि क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ जून २०२६ रोजी आरक्षणाचे जनक, बहुजनांचे कैवारी आणि सामाजिक समतेचे महान पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे.



भारतीय बौद्ध महासभा ही संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता आणि मानवतेच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत असून समाजामध्ये बौद्ध धम्म, सामाजिक जागृती आणि प्रबोधनाचे कार्य करत आहे. तर क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि युवक विकासाच्या क्षेत्रात विविध उपक्रम राबवून समाजहिताचे कार्य करीत आहे. या दोन्ही संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राजर्षी शाहू महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले आहे.

## ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार



**आष्टी :** अध्यात्म, तर्कशास्त्र, समाजप्रबोधन आणि पर्यावरण जनजागृतीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना राज्यस्तरीय "महाराष्ट्र भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दैनिक लोकनेता वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने आणि अभिनेत्री मेघना झुझम यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

परळी वैजनाथ येथील हॉटेल भागवत पॅलेस येथे झालेल्या या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. ग्रामीण शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या राजू महाराजांनी एम.ए.पर्यंत शिक्षण घेत अध्यात्माचा मार्ग स्वीकारला. खेमानंद महाराजांचे शिष्यत्व आणि रामकृष्ण रंधवे महाराजांच्या संस्थेतील सेवेमुळे त्यांच्या आध्यात्मिक कार्याला अधिक बळ मिळाले.

तर्कशक्तीवर आधारित व्यक्तिमत्त्व विश्लेषण, समाजप्रबोधन, नैराश्यग्रस्तांना मार्गदर्शन, आत्महत्यापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न, सामाजिक सलोखा आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांतील त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. यापूर्वीही त्यांना समाजरत्न, लोकरत्न आणि समाजभूषण यांसारखे प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

या पुरस्काराबद्दल विविध राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. सामाजिक बांधिलकी जपत जनजागृतीचे कार्य करणाऱ्या राजू महाराजांच्या कार्याला "महाराष्ट्र भूषण" पुरस्कारामुळे आणखी एक मानाचा मुकुट प्राप्त झाला आहे.

## जीवाचीवाडी व तुकुचीवाडी येथे हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन

### एनडीकेएसपी अंतर्गत बीजप्रक्रिया, सोयाबीन वाण निवड, शून्य मशागत, फळबाग व्यवस्थापन व हुमणी नियंत्रणावर भर



**केज :** खरीप हंगाम जवळ आल्याने शेतकऱ्यांकडून मशागत, खते व बियाणे खरेदीची लगबग सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड तथा तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांच्या मार्गदर्शनाखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (एनडीकेएसपी) अंतर्गत केज तालुक्यातील जीवाचीवाडी व तुकुचीवाडी येथे हवामान अनुकूल तंत्रज्ञान सीआरटी प्रात्यक्षिक मोहिमेअंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम व शेती शाळांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उपविभागीय तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी बियाणे उगवणक्षमता तपासणी, बीजप्रक्रिया, पक्षी थांबे व चिकट सापळ्यांचा वापर याबाबत मार्गदर्शन केले. एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर जेएस-९३०५, एमएयुएस-७१, एमएसयूएस-१५८, एमएयुएस-६१२ व केडीएस-९९२ या कमी ते मध्यम कालावधीच्या सोयाबीन वाणांची निवड करण्याचा सल्ला दिला. सोयाबीनमधील खोडमाशी नियंत्रणासाठी थायामेथोक्साम ३० टक्के एफएस सहा मिली प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करण्याची माहिती दिली.

शेतकऱ्यांना सरी-वरंबा तयार करून टोकण पद्धतीने सोयाबीन लागवड, शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब, ठिबक सिंचनाद्वारे पाणी व खतांचा कार्यक्षम वापर तसेच शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून बीजोत्पादन घटक राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. हुमणी व्यवस्थापनासाठी प्रकाश सापळे, एरंड सापळे तसेच निंबोळ्यांपासून लिंबोळी पेंड व पाच टक्के निंबोळी अर्क तयार करून वापरण्याची माहिती देण्यात आली.

सदर गावांमध्ये आंबा लागवड मोठ्या प्रमाणात असल्याने फळबाग लागवड योजना, आंबा बाग व्यवस्थापन, छाटणी, मूल्यवर्धन व प्रक्रिया उद्योगाबाबत माहिती देण्यात आली. आंबा तज्ज्ञ भगवानराव कापसे यांच्याशी संपर्क साधून देण्यात आला. तसेच प्रगतशील शेतकरी रामधन चौरे यांच्या आंबा बागेला भेट देऊन छाटणी व मीजमाशी व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास सहाय्यक कृषी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव, समूह सहाय्यक विवेकानंद आदमाणे, परमेश्वर चौरे, नामदेव चौरे, राजाभाऊ केदार, राजेभाऊ तांदळे, बाबू चौरे, पांडुरंग चौरे, दिलीप चौरे, श्रीराम चौरे, नवनाथ चौरे, गोवर्धन चौरे, मधुकर चौरे, बबन चौरे, प्रेमचंद चौरे, बाळनाथ चौरे, रमेश चौरे, सुरेश चौरे, हरिदास चौरे आदी शेतकरी उपस्थित होते.